# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२४

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### रायगड प्राधिकरणाच्या समितीवर स्थानिक आमदारांना घेण्याबाबतचा प्रस्ताव

**(१) ३९८८३ (१२-०४-२०२२). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड प्राधिकरणाच्या समितीवर स्थानिक आमदारांना प्राधान्याने घेण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदरहू समितीवर स्थानिक आमदारांना घेण्याबाबतची कार्यवाही कधीपर्यंत पूर्ण होईल,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-०२-२०२४) :** (१) व (२) दि.०५.१२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये रायगड किल्ला व परिसर विकास पर्यटन आराखडा प्राधिकरणामध्ये मा. विधानसभा सदस्य (महाड- माणगाव विधानसभा मतदारसंघ) यांचा सदस्य म्हणून समावेश करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### भामा-आसखेड (ता.खेड, जि.पुणे) येथील धरण कालव्यासाठी संपादित जमिनीवर शेतकऱ्यांच्या सातबारावरील शिक्के काढण्याबाबत

**(२) ४०१५४ (०७-०४-२०२२). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भामा आसखेड (ता.खेड, जि.पुणे) धरण प्रकल्पाच्या पुनर्वसनाकरिता अधिग्रहीत केलेल्या २१ गावातील शेतकऱ्यांच्या सातबारावरील कब्जेदार सदरी हक्काचे शिक्के रद्द करण्यात यावी, या मागणीसाठी शेतकऱ्यांना कृष्णा खोरे विकास मंडळाच्या दिनांक १९ जून, २०१७ रोजीच्या बैठकीत ठराव क्रमांक ९५/९ नुसार कालवा रद्द करण्याचे ठरले, हे खरे आहे काय,

(२) भामा आसखेड प्रकल्पातील प्रकल्प बाधितांना राज्य सरकारकडून मोबदला देण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, खेड तालुक्यातील १७ आणी दौंड तालुक्यातील १२ गावामधील पुनर्वसनासाठी राखीव शेरे कमी करण्यासाठीचा प्रस्ताव पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाने राज्य शासनाकडे पाठवला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुषंगाने शेतकऱ्यांच्या जमिनीवरील असलेले कब्जेदार आणि इतर हक्कातील शिक्के काढण्याचा निर्णय घेण्यात येवूनही भूसंपादन केलेल्या जमिनीवरील इतर हक्कातील शिक्के काढण्यात आले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी काय आढळून आले त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (२४-०१-२०२४) :** (१) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या दिनांक १७.०६.२०२० रोजीच्या बैठकीतील ठराव क्र. ९५/९ नुसार भामा आसखेड प्रकल्पातील कालवे रद्द करणेबाबत शिफारस करण्यात आली होती. त्यानुषंगाने जलसंपदा विभाग शासन निर्णय दिनांक २८.०८.२०२३ अन्वये भामा आसखेड प्रकल्पाचे कालवे रद्द करण्यात आलेले आहे.
(२) सद्यस्थितीत अशा प्रकारचा प्रस्ताव शासन स्तरावर कार्यवाहीत नाही.
(३) पुणे जिल्ह्यातील खेड व दौंड तालुक्यातील प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील स्लॅबपात्र भुधारकांच्या ७/१२ च्या इतर हक्कातील पुनर्वसनासाठीचे राखीव शेरे कमी करणेबाबत शासन पत्र दिनांक ०१.०९.२०२३ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.
(४ व (५) ज्या भुधारकांच्या जमिनी संपादीत करुन कब्जेदार सदरी जिल्हाधिकारी पुनर्वसन यांचे नाव दाखल झालेले आहे, अशा प्रकरणी विधी व न्याय विभागाचे सविस्तर अभिप्राय घेवुन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्धवत नाही.

---

**लोणकरवाडी (राजगुरुनगर) (जि.पुणे, ता. खेड) येथील १५ मोरांचा मृत्यू झाल्याबाबत**

**(३) ४५१४८ (२५-०९-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोणकरवाडी (राजगुरुनगर) (ता. खेड, जि.पुणे) येथील १५ मोरांचा मृत्यू झाल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी मोरांचा मृत्यू विषबाधेमुळे झाल्याची शक्यता काही ग्रामस्थांनी वर्तवली असून वन विभागाकडून चौकशीची मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०२-०२-२०२४) :** (१) जुन्नर वन विभागातील मौजे लोणकरवाडी पो. दावडी, ता. खेड, जि. पुणे येथिल मालकी गट नं. १०१ मधील परिसरात दिनांक १६.०४.२०२२ रोजी ४ मोर पक्षी व दिनांक १७.०४.२०२२ रोजी १ मोर पक्षी मृत अवस्थेत आढळून आलेले आहेत.
(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी मृत मोर पक्षांचे पशुवैद्यकीय अधिकारी, रेटवडी यांचेमार्फत शवविच्छेदन करण्यात आले असनू सदर मोरांचा मृत्यु हा उष्माघाताने झाला असल्याचे शवविच्छेदन अहवालात नमूद करण्यात आले आहे. तसेच मोरांचे अवयवांचे नमुने रोग अन्वेषन विभाग, औंध, पुणे येथे पाठविण्यात आले असता त्यांच्या अहवालानुसार मृत मोर पक्ष्यांना विषबाधा झाल्याचे आढळून येत नाही.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**नाशिकमध्ये वन्यप्राण्यांच्या कातडीची तस्करी झाल्याबाबत**

**(४) ४५४५५ (२५-०९-२०२२). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिकमध्ये वन्यप्राण्यांच्या कातडीची तस्करी करणारी टोळी कार्यरत असून इंदिरानगर भागात बिबट्याची कातडी आढळून आल्याचे दिनांक २६ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मृतावस्थेत आढळून आलेले प्राणी व शिकार झालेल्या प्राण्यांची वन विभागाकडे नोंद होत नसल्यामुळे तस्करीचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उक्त प्रकरणी वन विभागाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०२-०२-२०२४) :**(१) व (२) पश्चिम भाग नाशिक वनविभागातील वनपरिक्षेत्रात दिनांक २४.०३.२०२२ रोजी इंदिरानगर, नाशिक भागात बिबट्याची कातडी आढळून आली आहे.
(३) प्रस्तुत प्रकरणी वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ अंतर्गत गुन्हा नोंदेविण्यात आला असून सदर कातडी खरी अथवा खोटी असल्याची खातरजमा करण्याकरीता CCMB, हैद्राबाद यांना कातडीचे नमुने विश्लेषणासाठी पाठविण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## गोंदिया जिल्हयामध्ये वन्य प्राण्यांमुळे वनांजवळील शेतातील पिकांचे तथा घरांचे नुकसान झाल्याबाबत

**(५) ४६८०४ (२१-०९-२०२२). श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोंदिया जिल्हयातील जंगलालगतच्या शेतातील पिकांचे वन्य प्राणी हरीण व रानडुक्कर यासारख्या तृणभक्षी प्राण्यांमुळे पिकांचे तथा माकडांमुळे घरांचे नुकसान होत असल्याने शेतकरी बांधव त्रस्त असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत नवेगाव व नागझिरा व्याघ्र प्रकल्पालगतच्या तथा इतर जिल्हयातील भागातील शेतकरी बांधवांनी वन विभागाला तक्रारी देवुन कार्यवाही करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वन विभागामार्फत वन्यप्राण्यांचे बंदोबस्ताबाबत तथा पिकांचे व घरांचे होत असलेल्या नुकसान भरपाईबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०२-०२-२०२४) :**(१) सन २०२१-२२ मध्ये वन्यप्राण्यांनी गोंदिया जिल्ह्यातील वनालगतच्या शेतातील शेतपिकांचे नुकसान झाल्याच्या ४२९१ घटना निदर्शनास आल्या असून प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार संबंधितास रु. ३०९.६७ लक्ष इतकी नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे. तसेच माकडे गावामध्ये येवून गावकऱ्यांना त्रास व नुकसान करण्याच्या २ घटनांमध्ये वनविभागाचे क्षेत्रिय अधिकारी / कर्मचारी यांचेकडून प्रचलित नियमानुसार माकडांचा बंदोबस्त करण्यात आला आहे.
(२) हे खरे आहे.
(३) मानव-वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्या अनुषंगाने क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- वन्यप्राण्यांनी शेतपिकांचे नुकसान केल्यास प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यास नुकसान भरपाई अदा करण्यात येते.
- वन्यप्राण्यांमुळे अतिप्रसंग उद्भवल्यास प्रचलित नियमातील तरतुदीनुसार सदर वन्यप्राण्यास जेरबंद करुन नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यात येते.
- वन्यप्रण्यांचा अधिवास विकसित करण्याकरीता वनक्षेत्रामध्ये कुरण विकास तसेच फळ झाडांची लागवड करण्यात येते.
- वन्यप्राण्यांना वनक्षेत्रात पिण्याचे पाणी उपलब्ध होण्याकरीता वनक्षेत्रात पाणवठे, वनतळी इत्यादी तयार करण्यात येतात.

• वन्यप्राण्यांनी केलेल्या नुकसानीची भरपाई तात्काळ अदा करण्याकरीता उणे (-) प्राधिकाराची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्हयातील ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील कृत्रिम अभयारण्याच्या प्रस्तावास स्थगिती देण्याबाबत

**(६) ४६९९८ (१०-११-२०२२). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील बफर व कोर झोन जवळच लोहारानजिक कृत्रिम अभयारण्य उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याचे दिनांक ८ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कृत्रिम अभयारण्यामुळे ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील पर्यटनाला येणाऱ्या पर्यटकांची संख्या कमी होऊन शासनाच्या महसूलातही घट निर्माण होऊ शकते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे शासनाने येथे नवीन कृत्रिम अभयारण्य न करता कोअर झोनमधील क्षेत्रात वाढ करुन वाघांसह अन्य वन्य जीवांना नैसर्गिक अधिकार मिळावा यादृष्टीने विचारविनिमय करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०२-०२-२०२४) :**(१) व (२) ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील पर्यटनाचा ताण कमी करणे तसेच ताडोबात भ्रमंती किंवा सफारीचा लाभ घेता येत नसलेल्या देशी-विदेशी पर्यटकांना चंद्रपूर येथील सफारीचा लाभ घेता यावा व पर्यायाने स्थानिकांकरीता रोजगार निर्मिती होवून जिल्ह्याच्या महसूलात वाढ व्हावी या दृष्टीने चंद्रपूर जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पर्यटन स्थळांप्रमाणे व्याघ्र सफारीची निर्मिती करण्याकरीता एफ.डी.सी.एम.ली., नागपूर यांना निर्देश देण्यात आले आहेत.
(३) ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे कोअर क्षेत्र वाढवून वाघ व अन्य वन्यजीवांचा अधिवास वाढविण्याच्या दृष्टीने बफर क्षेत्रातील कारवा गावालगतचे एकूण ७८७९.२६ हेक्टर क्षेत्र समाविष्ट करुन विस्तारीत अंधारी वन्यजीव अभयारण्य घोषित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## अकोला जिल्ह्यातील वन्य प्राण्यांची अवैध शिकार होत असल्याबाबत

**(७) ४७५१४ (२५-०९-२०२२). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्ह्यात वन्यजीवाची क्रुरपणे हत्या करण्याचे प्रकार वाढत असून वन अधिकाऱ्यांच्या संगनमताने मोठ्या प्रमाणात अवैध शिकारी होत असल्याचे माहे जुन, २०२२ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पातुर वनपरिक्षेत्रात वन्य प्राण्यांची विक्री व अवैध शिकार करणाऱ्या टोळीला दिनांक १० जुन, २०२२ रोजी वा त्यासुमारास वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी अटक केली आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, सदर अवैध शिकारी प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०२-०२-२०२४) :** (१) अकोला वन विभागातील आलेगाव क्षेत्रामधील पिंपळडोळी भाग २ या नियतक्षेत्रातील नैसर्गिक पाणवठ्याजवळ दिनांक ०८.०६.२०२२ रोजी १२ माकड, ०१ निलगाय, ०१ काळविट व ०१ सातभाई पक्षी मृत अवस्थेत आढळून आले आहेत.
(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी वनपरिक्षेत्र अधिकारी, आलेगाव यांनी चौकशी करुन मौजे नवेगाव, ता. पातुर येथील ३ व्यक्तीं विरुध्द दिनांक ०८.०६.२०२२ रोजी वनगुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर प्रकरणातील मृत वन्यप्राण्यांचे शवविच्छेदन करुन नमुने तपासणीसाठी न्यायवैद्यक प्रयोगशाळा, अमरावती येथे पाठविण्यात आले आहेत. सदर प्रकरणाची चौकशी पूर्ण करण्यात आली असून न्यायालयात तक्रार दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्यातील राष्ट्रीय व्याघ्र प्रकल्पात वाघांचे मृत्यूचे प्रमाण रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत**

**(८) ४७८८३ (३१-१०-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या आकडेवारीनुसार येत्या तीन महिन्यात भारतातील एकूण झालेल्या ३९ वाघांच्या मृत्युपैकी महाराष्ट्र राज्यातील १० वाघांचा मृत्यू झाल्याचे दिनांक ९ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र राज्यातील राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्रकल्पात १० वाघांच्या झालेल्या मृत्युची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील वाघांचे वाढते मृत्युचे प्रमाण रोखण्यासाठी उपाययोजना करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०२-०२-२०२४) :** (१) दिनांक ०९.०१.२०२२ ते दिनांक ०९.०४.२०२२ या कालावधीत राज्यात नैसर्गिक कारणांमुळे ५, अपघातामुळे १, शिकारीमुळे १ व विद्युत प्रवाहाच्या धक्क्याने ३ असे एकूण १० वाघांचा मृत्यु झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) वाघ मृत्युच्या घटनांपैकी अनैसर्गिक (विद्युत प्रवाह व शिकारमुळे) मृत्युच्या घटनांच्या प्रकरणात वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ मधील तरतुदीनुसार वनगुन्हा नोंद करुन संबंधीत चौकशी अधिकाऱ्यांकडून प्रकरणाची चौकशी करण्यात येते.

- नागपूर वनवृत्तातील भंडारा वनविभागा अंतर्गत वनपरिक्षेत्र भंडारा येथील दिनांक २८.०१.२०२२ रोजी विद्युत प्रवाहाच्या धक्क्याने वाघ मृत्यू प्रकरणी ५ आरोपींना अटक करण्यात आली असुन प्रकरण सहदिवाणी न्यायालय क स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, भंडारा यांचे न्यायालयात न्यायप्रविष्ठ करण्यात आले आहे.
- नागपूर वनवृत्तातील नागपूर वनविभागा अंतर्गत उत्तर उमरेड वनपरिक्षेत्रातील दि.१३.०३.२०२२ रोजी विदयुत प्रवाहामुळे झालेल्या वाघ मृत्यू प्रकरणी चार संशयित आरोपींना अटक करण्यात येऊन प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी. जेएमएफसी (JMFC), उमरेड यांचे न्यायालयात दि.१६.११.२०२२ रोजी तक्रार दाखल करण्यात आली आहे.
- नागपूर वनवृत्तातील भंडारा वनविभागांतर्गत नाकाडोंगरी परिक्षेत्रात दिनांक ३१.०३.२०२२ रोजी शिकारीमुळे झालेल्या वाघ मृत्यू प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली आणि प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी (JMFC) तुमसर यांचे न्यायालयात प्रकरण न्यायप्रविष्ठ करण्यात आले आहे.
- नागपूर वनवृत्तातील गोंदिया-विभागात, अर्जुनी मोरगांव परिक्षेत्रातील दिनांक १३.०१.२०२२ रोजी विद्युत प्रवाहाच्या धक्क्याने झालेल्या वाघ मृत्यू प्रकरणी ७ आरोपींना अटक करण्यात आली असुन प्रकरणी न्यायालयात तक्रार दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) वाघांच्या संरक्षणाच्या दृष्टीने क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- परिक्षेत्र स्तरावर वाघ व बिबट या वन्यप्राण्यांचे मागोवाचा पंधरवाडी कार्यक्रम राबवून त्यांच्या अस्तित्वाबाबतची माहिती घेण्यात येते.
- पाणवठे व महत्वाचे ठिकाणी कॅमेरा ट्रॅप लावून संशयास्पद हालचालीवर पाळत ठेवण्यात येते. तसेच पाण्यामध्ये विष प्रयोग होऊ नये याकरीता नियमीत पाणवठ्याची तपासणी केली जाते. या व्यतिरीक्त पाणवठ्याकडे जाणा-या मार्गावर शिकारी लोकांव्दारे लोखंडी ट्रॅप लावले नसल्याची खातरजमा करण्यात येते.
- अवैध शिकारी लोकांची माहिती मिळण्याकरीता परिक्षेत्र स्तरावर खब-याची नेमणूक करण्यात आली असून त्यांचेकडून प्राप्त माहितीनुसार कार्यवाही करण्यात येते. विशेष व्याघ्र संरक्षण दलातील पथकामार्फत अतिसंवेदनशील क्षेत्रात नियमित गस्त करण्यात येते. तसेच डॉग स्कॉड अंतर्गत सुध्दा गस्ती करून शिकारी हालचालीवर नियंत्रण ठेवण्यात येते.
- गावालगत असलेल्या मुसाफिर लोकांचे डेरे तपासणी करण्यात येते व त्यांचे हालाचालींवर लक्ष ठेवण्यात येते.
- मेळघाट व्याघ्र प्रकल्पात सायबर सेल तयार करण्यात आला असून राज्यात शिकारीच्या घटना घडल्यास सायबर डाटाच्या (कक्षाच्या) मदतीने आरोपींचा शोध घेण्यात येतो. तसेच जिल्हास्तरीय व्याघ्र समितीच्या बैठकीत वाघ/ बिबट इतर वन्यप्राण्यांच्या संरक्षणाच्या उपाययोजनांची आखणी करण्यात येते.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

### मच्छीमारांच्या प्रश्नांचा अभ्यास व मत्स्यदुष्काळाचे निकष ठरविण्याबाबत

**(९) ४९७५२ (२९-०१-२०२३). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मच्छीमारांच्या प्रश्नांचा अभ्यास व मत्स्यदुष्काळाचे निकष ठरविण्यासाठी समिती नेमण्याची घोषणा मा. मत्स्यव्यवसाय मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान विधानमंडळात केली व त्यानुषंगाने दिनांक ९ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निर्णयाद्वारे प्रधान सचिव (पदुम) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुषंगाने मच्छीमारांचे सर्वेक्षण होवून शासनास अहवाल प्राप्त झाला आहे काय, त्यात कोणत्या शिफारशी करण्यात आल्या आणि त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१६-०१-२०२४) :**(१) होय.

(२) राज्यातील मच्छीमारांच्या प्रश्नांचा अभ्यास करून त्याबाबतचा अहवाल शासनास प्राप्त झाल्यानंतर मदत व पुनर्वसन, वित्त विभाग यांचे अभिप्राय घेवून मत्स्यदुष्काळाचे निकष ठरविण्याबाबतची कार्यवाही करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### घोडबंदर (जि.ठाणे) येथील मार्गावर होणारी वाहतूक कोंडी

**(१०) ५००६० (१८-०१-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घोडबंदर (जि.ठाणे) येथील वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी खारेगाव ते गायमुख या खाडीकिनारी मार्गात बाधित होणा-या कांदळवनाच्या बदल्यात सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वरमधील वळवण गावात पर्यायी जमिनी देण्यासंदर्भात निर्णय घेण्याची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने शासनाने याप्रकरणाची कार्यवाही त्वरित पूर्ण करण्यासाठी कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-१२-२०२३) :** (१), (२) व (३) ठाणे बाळकुम ते गायमुख रस्त्याच्या कामासाठी बाधित होणारे १२.२६०७ हे. कांदळवन क्षेत्र वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वळतीकरणाचा प्रस्ताव राज्य शासनाने दि.२७.०३.२०२३ रोजी केंद्र शासनास पाठविला आहे. सदर प्रस्तावामध्ये गडचिरोली जिल्ह्यातील मौ. मेंढेबोडी येथील १५ हे. क्षेत्र पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजुरा, कोरपना, जिवती व गोंडपिंपरी (जि.चंद्रपूर) येथे शेतकरी भूमीहीन असून जमिनीचा स्थायी पट्ट्यामध्ये रुपांतर करण्यात आले नसल्याबाबत**

**(११) ५५३५५ (२९-०१-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजुरा, कोरपना, जिवती व गोंडपिंपरी (जि.चंद्रपूर) येथे अनेक शेतकरी भूमीहीन असून जमिनीचा स्थायी पट्ट्यामध्ये रुपांतर करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाच्या विविध कल्याणकारी योजनेपासून शेतकरी वंचित असल्यामुळे पारंपारिक वननिवासी अधिनियमांतर्गत कच्चे पट्टे धारकांना कायमस्वरुपी पट्टे मंजुर करुन वनजमिनीचा मालकी हक्क मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी यांना दिनांक ३० मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने उक्त निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०२-०२-२०२४) :** (१), (२) व (३) राजुरा, कोरपना, जिवती व गोंडपिंपरी या तालुक्यात अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्क मान्य करणे), अधिनियम, २००६, नियम, २००८ व सुधारणा नियम, २०१२ या कायद्यानुसार वन जमिनी आदिवासी व गैर आदिवासी यांना नियमानुसार पट्टे देण्याची प्रक्रिया निरंतर राबविण्यात येत आहे.

प्रस्तुत कायद्यातील तरतूदी व नियम अधिक स्पष्ट असल्याने तरतूदीची पुर्तता होत असल्यास त्यांना तात्काळ पट्टे देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. याआधारे राजुरा तालुक्यात-२१७, कोरपना तालुक्यात-३३९, जिवती तालुक्यात-१३१९ आणि गोंडपिंपरी तालुक्यात-१९३ असे एकूण २०६८ लाभार्थ्यांना वन हक्क पट्ट्याचे वाटप करण्यात आले आहे. तसेच सदर लाभार्थ्यांच्या नावांनी ७/१२ तयार करुन वाटप करण्यात आले आहेत.

ग्रामविकास विभागाच्या दिनांक ११.३.२०२२ रोजीच्या राजपत्रान्वये अशासकीय सदस्यांचा कार्यकाल संपुष्टात आला असल्यामुळे जिल्हास्तरीय समितीचे आयोजन करण्यात आलेले नाही. त्यामुळे, माहे एप्रिल, २०२२ पासून वनहक्क दावे मंजूर करण्यात आलेले नाहीत. जिल्हास्तरीय वन हक्क समितीची नव्याने स्थापना झाल्यानंतर बैठकीचे आयोजन करुन वनहक्क नियमातील अटी व शर्तीची पुर्तता करणाऱ्या पात्र अतिक्रमणधारकांना दावे मंजूर करण्याची प्रक्रिया सुरु होईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर येथे गोंडवन सांस्कृतिक संग्रहालय उभारण्याबाबत

**(१२) ६१११८८ (०८-०५-२०२३). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासींचे जीवन, कला, भाषा, संस्कृती जपण्यासाठी सन २००२ मध्ये शासनाने शहरात गोंडवन सांस्कृतिक संग्रहालय उभारण्याची घोषणा केली असून याबाबत अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद नवी दिल्ली, नागपूर शाखा यांनी त्यांच्या दिनांक १८ डिसेंबर, २०१९ च्या पत्रान्वये सहआयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संग्रहालय उभारण्यासाठी प्रशासकीय मान्यता देऊन निधी वितरीत करण्यात आला असून अमरावती मार्गावरील सुराबर्डी येथे १२ एकर जागाही देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर संग्रहालय उभारण्यासाठी सहसंचालक, आदिवासी संशोधण संस्था, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली तज्ञ सल्लागार समिती गठीत करण्यात आली असून तज्ञांच्या मार्गदर्शनाने आराखडा करण्याचे काम सुरु आहे. तसेच प्रस्तुत संग्रहालयाच्या जागेवर संरक्षण भिंत बांधण्याचे काम सुरु झाले असूनही सदर संग्रहालय उभारण्यास विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संग्रहालय तथा प्रशिक्षण उपकेंद्राचे संकल्पचित्र व बांधकाम आराखडा तयार करण्यासाठी वास्तुविशारदाकडून प्राप्त होणा-या संकल्पनांची चाचणी करण्यासाठी कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर, नवी दिल्ली यांच्या नियमानुसार ज्युरी तथा बोर्ड ऑफ असेसर्सची सुधारीत रचना करुन नियुक्ती करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर संग्रहालय उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. विजयकुमार गावीत (०९-०२-२०२४) :** (१) हे खरे आहे

(२) अंशतः खरे आहे.

अमरावती मार्गावरील सुराबर्डी येथे १०+५ अशी एकुण १५ एकर जागा उपलब्ध झाली आहे.

(३) अंशतः खरे आहे.

संरक्षण भिंत बांधण्याचे काम सुरु असुन संग्रहालयाच्या उभारणीच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

(४) हे खरे आहे

(५) आर्किटेक्चर नकाशे व आराखडे तयार करण्यात आले असुन सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर येथील करवीर निवासिनी श्री.अंबाबाई मंदिराच्या सुधारणेबाबत

**(१३) ६१२३३ (२०-०४-२०२३). श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील अंबाबाई मंदिराच्या जतन,संवर्धन, सौंदर्यासाठी पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीला अपेक्षीत असलेल्या सर्व परवानग्या देण्यात येतील असे आश्वासन भारतीय पुरातत्व विभागाच्या संचालिका श्रीमती नंदिनी साहू यांनी कोल्हापूर भेटी दरम्यान दिनांक ७ डिसेंबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रश्नी देवस्थान समितीने प्रलंबित असलेले प्रस्ताव किंवा मंदिराचे वास्तु सौंदर्याचे जतन करण्याचे विविध विकास कामे पूर्ण करण्यासाठी केंद्रीय पुरातत्व खात्याकडे कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी केंद्रीय पुरातत्व विभागाने सदरच्या परवानग्या किती दिवसांत देणार,याबाबत शासनाने

कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०१-२०२४) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
कोल्हापूर येथील अंबाबाई मंदिर हे भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाचे संरक्षित स्मारक नाही. श्रीमती नंदिनी साहू यांनी दि.०७.१२.२०२२ रोजी सदर मंदिरास दर्शनासाठी भेट दिली होती. या भेटी दरम्यान अंबाबाईच्या मुर्तीचे जतन व संवर्धन करण्यासाठी संचालक, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय तसेच जतन व संवर्धन क्षेत्रातील तज्ञांचा समावेश असलेल्या तज्ञ समितीची स्थापना करण्याचा सल्ला पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीला दिला.
(२) क्षेत्रीय निर्देशक, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, पश्चिम क्षेत्र, सायन, मुंबई यांच्याकडे संबंधित विकास कामासाठी कोणताही प्रस्ताव प्रलंबित नाही.
(३) परवानग्याबाबतचा कोणताही प्रस्ताव मंदिर प्राधिकरणाकडून क्षेत्रीय निर्देशक, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, पश्चिम क्षेत्र, सायन, मुंबई यांच्याकडे प्रलंबित नसल्याचे भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वडगांव रासाई (ता.शिरुर, जि.पुणे) येथे राखीव वनक्षेत्रामध्ये देशी वृक्षांची लागवड करण्याबाबत**

**(१४) ६१३३५ (२१-०४-२०२३). ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वडगांव रासाई (ता.शिरुर, जि.पुणे) येथे भिमा नदी लगत वन विभागाचे सुमारे १०० ते १५० हेक्टर राखीव वनक्षेत्र आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या वनक्षेत्रामध्ये प्रोसोपिस (वेडीबाबळ) मोठ्या प्रमाणात असून या वनक्षेत्रामध्ये प्रोसोपिस (वेडीबाबळ) काढून त्याऐवजी देशी वृक्षांची लागवड करण्याच्या शासनाच्या विचाराधीन आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी व पाहणी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-१२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
मौजे वडगाव रासाई ता. शिरुर जि. पुणे येथे भिमा नदी लगत एकूण १९२.३२ हेक्टर राखीव वनक्षेत्र आहे.
(२) व (३) हे खरे आहे.
शासकीय योजनांच्या माध्यमातून तसेच लोकसहभागातुन मौजे वडगाव रासाई ता. शिरूर, जि. पुणे येथील वनगट क्रमांक ९८ मध्ये सन २०२२-२३ च्या पावसाळयात प्रोसोपिस काढून ४ हेक्टर रोपवन करण्यात आलेले आहे. तसेच दरवर्षी टप्याटप्याने विविध निधी स्त्रोतातून सदर कामे करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) अशी बाब नाही.

---

**राज्यातील धुळे जिल्ह्यासह शेतकऱ्यांच्या अनेक मागण्यांबाबत**

**(१५) ६४८०७ (२४-०८-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील धुळे जिल्ह्यासह शेतकऱ्यांच्या शेतमालाला खर्चाच्या दीडपट भाव द्यावा, स्वामीनाथन आयोगाच्या सर्व शिफारशी लागू कराव्यात व शेतकऱ्यांना नियमित वीजपुरवठा करावा इत्यादी मागण्यांसाठी धुळे येथील शेतकऱ्यांनी उपोषण केले असल्याचे दिनांक १६ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शेतकऱ्यांच्या मागण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (२४-०१-२०२४) :** (१) धुळे जिल्हयातील सर्व तालुका कृषि अधिकारी कार्यालये व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयास शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांच्या अनुषंगाने उपोषणाबाबत कोणत्याही प्रकारचे निवेदन प्राप्त झालेले नसून दिनांक १६ मे, २०२३ रोजी उपोषण झालेले नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील किल्ल्यावर डागडूजी व नूतनीकरण करण्यात आलेले काम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

**(१६) ६५२०४ (२८-०८-२०२३). श्री.निलेश लंके (पारनेर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कात्रज (पुणे) येथील शिवालय प्रतिष्ठानचे श्री. योगेश शेलार यांनी राज्य शासनाच्या पुरातन विभागाकडून राज्यातील किल्ल्यावर शासनाकडून डागडूजी व नूतनीकरण करण्यात आलेले असून ते अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून सदर काम करणाऱ्या संबंधित ठेकेदाराविरोधात कारवाई करावी अशी लेखी मागणी केल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिवालय प्रतिष्ठानचे संस्थापक यांनी राज्य शासनाच्या पुरातन विभागातील विभागीय पुरातन अधिकारी विकास वाहने यांना व खात्यास पाठविण्यात आलेल्या पत्रामध्ये कोणकोणत्या गडावरील कोणकोणती कामे निकृष्ट दर्जाची झाल्याची तक्रार केली आहे, सदर कामाचा ठेका कोणाला दिला होता, तक्रारीनुसार संबंधित अधिकाऱ्यांनी सदर कामाची तपासणी करून तक्रार खरी आहे की नाही याचा तपास पूर्ण केला आहे काय,
(३) असल्यास तपासाचे निष्कर्ष काय आहे, त्यानुसार उक्त कामे निकृष्ट दर्जाची झाली असल्यास संबंधित ठेकेदारा विरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-०२-२०२४) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) व (३) प्रश्नाधीन संस्थेने सिंहगड किल्ला, ता. हवेली, जि.पुणे या किल्ल्यावरील बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याची तक्रार पुरातत्व व संचालनालयाकडे केली होती. वस्तुसंग्रहालये सदर काम सन २०१२-१३ मध्ये मे. अरुण के. लांजेवार, शास्त्रीनगर, तुमसर, जि. भंडारा यांना देण्यात आले होते. या तक्रारीच्या अनुषंगाने सिंहगड किल्ल्यावरील निकृष्ट बांधकामाबाबत कॉलेज ऑफ इंजिनिरिंग, पुणे यांच्याकडून तपासणी करण्यात आली. तपासणीअंती कंत्राटदाराने केलेले काम पुरातत्वीय निकषानुसार व गुणवत्तापूर्ण केलेले नसल्याचे आढळून आल्याने कंत्राटदाराकडून दंड वसुल करण्यात आला. तसेच कंत्राटदाराला नामिकासुचीमधून वगळण्यात आले व काळ्या यादीत टाकण्यात आले. सद्य:स्थितीत या बांधकामाच्या दुरुस्तीसाठीचे काम नव्याने करण्यात येत असून निविदास्तरावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वनक्षेत्रातील बेसुमार वृक्षतोडीसह वाढत असलेल्या वणव्यांमुळे जंगलाचे अस्तित्व धोक्यात आल्याबाबत

**(१७) ६५३५५ (२४-०८-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वनक्षेत्रातील बेसुमार वृक्षतोडीसह दिवसेंदिवस वाढत असलेल्या वणव्यांमुळे जंगलाचे अस्तित्व धोक्यात आले आहे तसेच अचानक लागणाऱ्या वणव्यामुळे वन्यजीवांचा होरपळून मृत्यू होत असून शेतकरी व गरीब कुटूंबातील लोकांना मिळणारा रोजगारही हिरावला जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच पुणे जिल्ह्यातील वनविभागाच्या टेकडीवर माहे जानेवारी ते मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान ९४१ घटनांची नोंद झाल्याची माहिती फॉरेस्ट सर्व्हे ऑफ इंडियाने प्रसिद्ध केलेल्या सॅटॅलाईटद्वारा कार्यरत असलेल्या फॉरेस्ट अलर्ट सिस्टीमद्वारे जाहीर केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या वणव्यांच्या घटनेमुळे करोडो हेक्टर वन क्षेत्राचे नुकसान होऊन वन्यजीवांचा बळी जात असल्याने वनविभागामार्फत स्थानिक पातळीवर दक्षता पथक स्थापन करण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात जैवविविधता व पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी महत्त्वाकांक्षी असलेल्या वनक्षेत्राचा ऱ्हास होऊ नये यासाठी व वनविभागाच्या अपुऱ्या मनुष्यबळामुळे स्थानिक लोकांचा सहभागाकरिता नवीन शासन धोरण आखण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०१-२०२४) :** (१) सिंधुदुर्ग जिल्हयातील वनक्षेत्रात सन २०२० ते सन २०२२ मध्ये एकूण १५४२ अवैध वृक्षतोडीची संख्या आढळून आलेली आहे.

सन २०२०-२१ मध्ये २९ व सन २०२१-२२ मध्ये २८ अशा एकूण ५७ वनवणव्याच्या घटना घडल्या होत्या. मात्र सन २०२२-२३ मध्ये ९७ आगीच्या घटना घडल्या होत्या. घटना वाढण्याचे कारण हे या हवामानातील वाढत्या तापमानामुळे घडलेल्या आहेत.

अचानक लागणाऱ्या वणव्यामुळे सिंधुदुर्ग जिल्हयात वन्यजीवांचा होरपळून मृत्यू झाल्याच्या घटनाची नोंद नाही. वणव्यामुळे झालेली जळीत नुकसानी ही जमिनी लगत जळीत झालेल्या पालापाचोळयाची आहे. मोठे वृक्ष वणव्यामध्ये जळीत झालेले नाहीत. तसेच वणव्यामुळे गरिब शेतकरी कुटुंबातील लोकांना मिळणाऱ्या रोजगारावर कोणताही परिणाम झालेला नाही.
(२) भारतीय वनसरंक्षक संस्थेकडून (forest Survey of India) यांचेकडून क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी यांना त्यांचे रजिस्ट्रेशन मोबाईल क्रमांकावर वनवा लागल्याचे फायर अलर्ट येत असुन त्यावर कार्यवाही करण्यात येत आहे.

पुणे व जुन्नर वनविभागात माहे जानेवारी २०२३ ते मे २०२३ या कालावधीत ४९० फायर अलर्ट प्राप्त आहेत.
(३) पुणे व जुन्नर वनविभागाच्या कार्यक्षेत्रात वनव्याच्या घटनांमुळे करोडो हेक्टर वनक्षेत्राचे नुकसान मोठया प्रमाणात होवुन वन्यजीवांचा बळी जाण्याचा घटना घडलेल्या नाहीत वणवा नियंत्रणासाठी पुणे जुन्नर वनविभागात दक्षता पथक कार्यरत आहे.
(४) वनवणव्याच्या घटना घडू नयेत म्हणून खालील उपाययोजना केल्या जातात:-
१) वनसरंक्षणार्थ रात्रीच्यावेळी क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून जंगलात गस्त घालण्यात येते. वनवणवा नियंत्रणासाठी जाळरेषा काढण्यात येतात तसेच फायर वॉचराची नेमणूक करण्यात येते.
२) वनांच्या सरंक्षणार्थ वना शेजारी असणाऱ्या गावांमध्ये गावपातळीवर संयुक्त वनव्यावस्थापन समित्यांची स्थापना करण्यात आली आहे.
३) वन विभागांतर्गत आगीच्या घटनांवर नियंत्रण व सनियंत्रण करण्यासाठी सद्यस्थितीत आगप्रतिबंधक उपकरणे उपलब्ध असून त्यांचे वाटप वनपरिक्षेत्र स्तरावर करण्यात आलेले आहे.
४) Forest Survey of India (FSI) कडून क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी यांना त्यांचे रजिस्ट्रेशन मोबाईल क्रमांकावर वणवा लागल्याचे फायर अलर्ट येत असून त्यावर तात्काळ कार्यवाही करण्यात येत आहे.
५) स्थानिक पातळीवर प्राथमिक बचाव टिम (PRT) व रेस्क्यू ऑपरेशनचा अनुभव असलेल्या क्षेत्रिय कर्मचारी यांची Rapid Response Tem (RRT) तयार करण्यात आलेली आहे.
६) वनालगतच्या गावामध्ये वनसंरक्षण समित्यांची स्थापना करुन ग्रामस्थांना थेट गावच्या वनसंरक्षण व वनसंवर्धन कामामध्ये सहभागी करुन घेण्यात आलेले असून वणवा लागल्याचे निदर्शनास येताच तात्काळ नियंत्रण प्राप्त करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(७) वन विभाग स्तरावर प्रत्येक वनपरिक्षेत्रात स्थानिक स्वयंसेवी तरुणांचा सहभागाने रेस्क्यू पथके स्थापन करण्यात येवून त्यांचेकडून वन्यजीव मानव संघर्षावरोबरच वनवणव्यावर नियंत्रण प्राप्त करण्यात येत आहे.

(८) वनविभागात जागतिक वन दिन, वन्यजीव सप्ताह, वनमोहोत्सव, वन अग्निशमन सप्ताह यानिमित्ताने मोठया प्रमाणात जनजागतीवर उपक्रम राबविण्यात येतात.
(९) गावातील लोक व शाळकरी मुलांना अवैध वृक्षतोड, अतिक्रमण यांच्या दुष्परिणामांची माहिती देण्यासाठी जनजागृती मोहिमेत सहभाग घेतला जातो.
(१०) पुणे तथा सिंधुदुर्ग जिल्ह्यात पर्यावरण जागृतीचे संदेश देणारे माहिती फलक लावण्यात आले आहेत. पर्यावरण विषयक जनजागृती माहिती फलक लावण्यात आले आहेत. पर्यावरण विषयक जनजागृतीची माहिती देण्यासाठी प्रिंट, डिजीटल आणि ईलेक्ट्रॉनिक मिडीयाचा वापर केला जातो.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जव्हार (जि ठाणे) शहापूर मतदार संघावर निधी वाटप करताना भेदभाव करीत असल्याबाबत**

**(१८) ६५७८९ (१०-१०-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि ठाणे) येथील सन २०२१-२२ व २०२२-२३ मध्ये आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी, जव्हार (जि ठाणे) यांच्याकडून निधी वाटप करताना भेदभाव करुन शहापूर ग्रामपंचायतीवर व तेथील आदिवासी समाजावर अन्याय करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी, जव्हार यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी पत्रव्यवहार केलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पत्रव्यवहाराबाबत प्रकल्प अधिकारी यांच्याकडून कोणतीही अंमलबजावणी अथवा ठोस कार्यवाही केली जात नसून, विकास कामांचे आराखडे तयार करताना स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात घेतले जात नाही अशी भावना येथील जनतेमध्ये आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी सन २०२१-२२ व २०२२-२३ मध्ये आदिवासी विकास प्रकल्प, जव्हार यांनी मान्यता दिलेल्या सर्व कामांची शासन उच्चस्तरीय चौकशी करणार आहे काय, त्यानुषंगाने सदर आदिवासी जनतेला न्याय मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (१२-१२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) जिल्हा आदिवासी घटक कार्यक्रम योजना अंतर्गत घेण्यात येणारी कामे ही जिल्हा नियोजन समितीच्या मान्यतेने घेण्यात येतात. दि.१६.१२.२००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत जिल्हयातील स्थानिक स्वराज्य संस्था (जिल्हा परिषद, नगर परिषद, नगर पंचायत) यांच्या अखत्यारीतील कामांची निवड व प्रशासकीय मान्यता संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत देण्यात येते व त्यास प्रकल्प कार्यालयामार्फत निधी वितरीत केला जातो. तसेच जिल्हयातील उर्वरीत राज्यस्तरीय यंत्रणेकडील कामे जिल्हा नियोजन समितीच्या सूचनेनुसार निवड करुन त्या कामांना प्रशासकीय मान्यता व निधी प्रकल्प कार्यालयामार्फत वितरीत करण्यात येतो.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिखलोली (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथील कोयना प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत**

**(१९) ६६१०४ (२५-०८-२०२३). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ नगरपालिका हद्दीतील चिखलोली सर्वे नं.३९ या जागेवर कोयना प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी प्रकल्प राबविला जाणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी राबविण्यात येणाऱ्या पुनर्वसनास चिखलोली येथील जमीन गायरान असून व शासकीय नसल्याने ग्रामस्थांचा याबाबत विरोध असल्याचे दि.१८ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील अनेक वर्षापासून प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यात न आल्यामुळे भूमीपुत्रांना बेघर होण्याची वेळ आल्याने त्यांचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (१९-०१-२०२४) :** (१) ठाणे जिल्ह्यातील मौजे चिखलोली येथील स. नं. ३९ या जागेवर पुनर्वसनासाठी कोणताही प्रकल्प राबविला जाणार नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) कोयना प्रकल्पग्रस्तांचे संकलन अद्यावत करण्यातबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी सातारा यांच्या कार्यालयामार्फत सुरु आहे. तसेच मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक ०४.१०.२०२३ रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने कोयना व तत्सम प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिन वाटप प्रकरणांची तपासणी करण्याच्या अनुषंगाने उच्चाधिकार समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर समितीचा अहवाल मा. उच्च न्यायालयास सादर करावयाचा आहे. त्यानुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यात ऊस तोडणी मुकादमांकडून ऊस वाहतूकदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाल्याबाबत**

**(२०) ६६४३२ (२८-०८-२०२३). श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.शेखर निकम (चिपळूण), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील ऊस वाहतूकदारांकडून लाखो रुपये ॲडव्हान्स घेऊन ऊस तोडणीसाठी मजूर न पाठविता मुकादमांनी फसवणूक केली असल्याने जिल्ह्यात विविध ठिकाणी फिर्यादी दाखल करण्यात आल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्ह्यात मुकादामांकडून ऊस वाहतूकदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाल्याने उस तोडणीची कामे पूर्ण होऊ शकली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच राज्यात ठिकठिकाणी ऊस वाहतूकदार वाहनचालकांची टोळी मुकादमाकडून फसवणूक करण्याच्या गुन्ह्यात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने हस्तक्षेप करुन शेतकरी वाहतूकदार व कारखान्यांचे फसवणूक थांबविण्यासाठी विशिष्ट यंत्रणा निर्माण करावी, अशी मागणी राज्यातील शेतकरी व वाहतूकदारांच्या संघटनांनी शासनाकडे वेळोवेळी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त मागणीबाबत तसेच मुकादमांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२३-११-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) ऊस तोडणीच्या कामामध्ये विलंब झालेला आहे.तथापि कोल्हापूर जिल्हयातील कोणत्याही कारखान्यांच्या कार्यक्षेत्रातील ऊस गाळपा अभावी शिल्लक राहिलेला नाही.
(३) कोल्हापूर जिल्हयामध्ये एकूण ६७१ गुन्हे नोंद झाले असून पोलिस विभागामार्फत तपासाची प्रक्रिया चालू आहे.
(४) दाखल तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित पोलिस स्टेशनच्या स्तरावर पुढील कार्यवाही सुरू आहे.
(५) गाळप हंगाम सन-२०२१-२२ व सन-२०२२-२३ या दोन गाळप हंगामात १०७१९ मुकादमानी राज्यातील साखर कारखान्यांची
अंदाजे रू.५२०७१.२८ लाख इतकी रक्कम बुडवलेली आहे असे दिसून आले आहे. राज्यातील साखर कारखाना क्षेत्रात ऊस तोडणी मुकादम / मजूर टोळया यांच्याकडून होत असलेल्या फसवणुकीसंदर्भात कायदेशीर कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने साखर आयुक्तलयाकडून प्राप्त प्रस्ताव माहे जून, २०२३ मध्ये गृह विभागाकडे पाठविण्यात आला आहे.
(६) प्रश्न उदभवत नाही.

---

**विनापरवाना आदेश पारित करणाऱ्या अप्पर जिल्हाधिकारी, पुणे यांच्यावर कारवाई करण्याबाबत**

**(२१) ६६६६० (२५-०८-२०२३). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अप्पर जिल्हाधिकारी पुणे यांनी दिनांक ५ एप्रिल, २०२३ रोजी आदेश क्रमांक आर टी एस कावी २४२/ २३ क्रमांक मध्ये कुळ कायदा कलम ७४अ नुसार आवश्यक पक्षकारांना नोटीसा न काढता आदेश पारित केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कुळ कायद्याच्या कलम ७४अ नुसार कारवाई न केल्यामुळे शेतकऱ्यांच्या निवेदनानुसार माननीय मुख्यमंत्री यांच्याकडे दिलेल्या निवेदनावर कारवाई करावी असे आदेश दिनांक १३ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास अतिरिक्त मुख्य सचिव, महसूल यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ अन्वये सात दिवसापेक्षा अधिक काळ माननीय मुख्यमंत्री महोदयाचे आदेश प्रलंबित राहिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नियमबाहय कामकाज करणाऱ्या अप्पर जिल्हाधिकारी पुणे यांच्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१५-०२-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

अपर जिल्हाधिकारी, पुणे कार्यालयाकडे अर्जदार श्री. सोमनाथ शांताराम तरस व दियालराम सुरजलराम विष्णोई यांनी दि०५/०४/२०२३ रोजी समक्ष उपस्थित राहून तहसिलदार, मावळ यांचेकडील प्रकरण कुळकायदा केस/३२/ग/९/२०१७ या प्रकरणाची सुनावणी स्थगिती करुन सदर प्रकरणी इतर तहसिलदार यांचेकडे वर्ग करणेबाबत समक्ष अर्ज दाखल केला होता. सोबत उपविभागीय अधिकारी, मावळ-मुळशी उपविभाग, पुणे यांचे कार्यालयाचे सदर प्रकरण तहसिलदार मुळशी यांचेकडे वर्ग करणेबाबतचा दिनांक १४/०२/२०२३ रोजीचा आदेश जोडला होता. सदर अर्जावर समक्ष दाखल करताना सुनावणी वेळी अर्जदारांनी तहसिलदार मावळ यांचेवर विश्वास राहिला नसलेने प्रकरण

तातडीने वर्ग करणे आवश्यक असलेबाबत युक्तिवाद केला होता. सदर युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर सदर प्रकरण तातडीने वर्ग करणे आवश्यक असलेबाबत अपर जिल्हाधिकारी, पुणे या न्यायाधिकरणाच्या सुनावणीमध्ये खात्री झाल्याने महाराष्ट्र कुळवहिवाट आणि शेतजमिन अधिनियम १९४८ चे कलम ७४ अ अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदर प्रकरण तात्काळ तहसिलदार हवेली यांचेकडे वर्ग करण्याबाबत आदेश निर्गमित केले होते. सदर न्यायाधिकरण अपर जिल्हाधिकारी, पुणे या न्यायाधिकारणाने अर्धन्यायिक स्वरूपात पारित केला असल्यामुळे ज्या पक्षकरांना तो आदेश मान्य नसेल त्यांनी त्याबाबत योग्य त्या सक्षम अपिल न्यायाधिकरणाकडे अपिल दाखल करुन न्याय मागणे आवश्यक होते. तथापि ज्या तहसिलदारांवर अविश्वास होता त्या तत्कालीन तहसिलदार, मावळ यांची मावळ येथुन बदली झालेली असल्याने अर्जदार यांनी अपिल वर्ग करणेबाबत दिलेली कारणे संपुष्टात आलेली आहे. त्यामुळे अपर जिल्हाधिकारी, पुणे न्यायालयाने दि. ०५/०४/२०२३ रोजी अपिल वर्ग करणेबाबत दिलेला आदेश दि. ०७/०७/२०२३ रोजी रद्द करणेत आलेला आहे. व प्रकरण पुन्हा सुनावणीसाठी मुळ तहसिलदार, मावळ यांचेकडे परत करणेत आले आहे. तहसिलदार मावळ यांनी सदर प्रकरणी सर्व हितसंबंधितांना सुनावणीची संधी देऊन प्रकरणी निर्णय घेण्याचा आदेश पारित केलेला आहे. त्यामुळे सदर प्रकरणात केस वर्ग झालेला आदेश रद्द झाल्यामुळे प्रकरण सुनावणीसाठी पुन्हा मुळ तहसिलदार, मावळ यांचेकडे वर्ग झालेले आहे.

(२), (३) व (४) सदर प्रकरणी शासन पत्र क्र. संकीर्ण २०२३/प्र.क्र.६७/ज-१अ, दि.१०/०५/२०२३ अन्वये जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडून अहवाल मागविला आहे. सदर अहवाल शासनास अप्राप्त आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यात बारसू परिसरातील रिफायनरी प्रकल्प रद्द करण्याबाबत**

**(२२) ६६९८२ (२४-०८-२०२३). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यात बारसू येथील कातळशिल्प हा कोकणचा सर्वात मोठा ठेवा असल्याने त्याचा संबंध अगदी मानवी उत्क्रांतीपर्यंत जात असल्याने येत्या काही वर्षात कोकण हे पर्यटन दृष्ट्या जगाचे आकर्षण ठरणार असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यातील बारसू, सोलगाव, देवाचे गोठणे, सोगमवाडी, गोवळ, शिवणे आदी गावांच्या माळरानावर १७० हून अधिक दुर्मिळ व प्राचीन कातळशिल्पे असून याच परिसरात प्रस्तावित असलेल्या रिफायनरी प्रकल्पांमुळे सदर कातळशिल्पे धोक्यात आली आहेत, तसेच यापैकी ८ ठिकाणची कातळशिल्पे युनेस्कोच्या जागतिक वारसास्थळांच्या यादीत समाविष्ट झालेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त काताळशिल्पांची केंद्र सरकारने दखल घेतली असून बारसू येथील कातळशिल्पाचे ड्रोन सर्वेक्षणही करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय

(४)असल्यास, बारसू येथील या कातळशिल्पांचा योग्य पद्धतीने अभ्यास झाल्यास इसवी सन पूर्व मानल्या जाणाऱ्या इंडस व्हॅली, मिश्र (इजिप्त) मेसोपोटेनियम (इराण, इराक)व चिनी संस्कृतीचा उगम राजापूर बारसू येथूनच होण्यास वेळ लागणार नाही असे मानले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास,उक्त कातळशिल्पांच्या जतन, संवर्धनासाठी तसेच पर्यटन विकासासाठी रिफायनरी प्रकल्प रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,नसल्यास विलंबाची कारणे काय?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-०२-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सन २०२०-२१ पासून रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात करण्यात आलेल्या कातळशिल्पांच्या सर्वेक्षणात बारसू येथील गावात ६२ कातळशिल्पांची नोंद करण्यात आली आहे. कोकणात अन्यत्रा आढळलेले कातळशिल्प सोडून बारसू येथील तीन आकृत्यांचा समावेश जागतिक वारसा प्रस्तावात करण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ यांनी प्रस्तावित रिफायनरीसाठीच्या भूसंपादनाच्या प्रस्तावातून कातळशिल्पाच्या सभोतालची जमीन वगळण्याचा निर्णय घेतला आहे.

(३) हे खरे नाही.
(४) सदर बाब ही संशोधनात्मक आहे. याबाबत विद्यापीठ आणि संशोधकांमार्फत संशोधन झाल्याशिवाय ठाम मत व्यक्त करता येत नाही.
(५) प्रस्तावित रिफायनरीसाठी भूसंपादन प्रक्रीया राबविताना पुरातत्व विभागाचे याबाबतचे धोरण विचारात घेवून पूरातत्व विभागाशी संबधित क्षेत्र वगळून भूसंपादनाची कार्यवाही उद्योग विभागामार्फत करण्यात येणार आहे.

---

## बुलढाणा जिल्ह्यात स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त पंचायतन वन उद्यान मंजूर करण्याबाबत

**(२३) ६७१८८ (२४-०८-२०२३). अ‍ॅड.आकाश फुंडकर (खामगांव), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त वर्षभरात तीन प्रकारची १००० उद्याने विकसित केल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामध्ये पंचायतन, अमृत आणि बेल या उद्यानाचा समावेश असून या सर्वांची जबाबदारी वन विभागास देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पंचायतन वन उद्यान अंतर्गत प्रत्येक जिल्ह्यातील २५ गावांमध्ये ही उद्याने उभारण्यात येणार असून शासनाने बुलढाणा जिल्ह्यातील कोणत्या गावांची निवड केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-१२-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमीत्त राज्यात पंचायतन वन उद्यान, अमृत वन उद्यान आणि बेल वन उद्यानांची निर्मिती करण्याबाबत महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक १०.०४.२०२३ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयानुसार राज्यात प्रत्येक जिल्ह्यातील २५ गावांमध्ये पंचायतन वन उद्यान, ७५ शहरात / जिल्ह्यांच्या / तालुक्यांच्या / स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ठिकाणी अमृत वन उद्यान आणि धार्मिक स्थळांच्या ७५ ठिकाणी बेल वन उद्यान असे एकूण ९७५ उद्यानांची निर्मिती करण्यात येत आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक १०.०४.२०२३ मधील तरतुदीनुसार पात्र ठरणाऱ्या बुलढाणा जिल्ह्यातील २५ गावांपैकी अद्यापर्यंत अनुकुल जमिनीच्या उपलब्धतेनुसार निवड करण्यात आलेल्या १६ गावांचा तालुकानिहाय तपशिल खालीलप्रमाणे आहे:-
बुलढाणा जिल्ह्यातील पंचायतन वन उद्यान निर्माण करण्यासाठी निवड करण्यात आलेली गावे

| तालुक्याचे नाव | गावाचे नाव |
|---|---|
| मेहकर- | सारंगपुर |
| चिखली- | भोकर |
| बुलढाणा- | बुलढाणा व्ह्यु पॉईंट |
| मोताळा- | ईब्राहीमपूर |
| लोणार- | वडगांव तेजन, बोरखेडी व अंजनी खुर्द. |
| देऊरगांव राजा- | डिग्रस बु., डिग्रस खु., चिंचखेड |
| जळगांव जामोद- | खांडवी |
| खामगांव- | जनुना |
| सिंदखेड राजा- | उमरद, उगला वैष्णवगड, सिंदखेउ राजा खंडोबा मंदीर |
| नांदुरा- | महाळुंगी |

उर्वरित ९ गावांची निवड करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) सदर योजना ही सन २०२३-२४ ते २०२९-३० या ७ वर्षाच्या कालावधीमध्ये राबविण्यात येत असल्याने विलंब झालेला नाही.

---

## सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) येथे साखरखेर्डा ते पिंपळगाव सोनारा मार्गावर केलेल्या वृक्षारोपणाबाबत

**(२४) ६७६५४ (२८-०८-२०२३). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) येथे सामाजिक वनीकरण विभागाने हनवतखेड व दरेगाव वन परिक्षेत्रात वृक्षारोपण केले नसताना साखरखेर्डा ते पिंपळगाव सोनारा मार्गावरील वृक्षरोपणावर १२ लाख रुपये खर्च केल्याचे दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास माहितीच्या अधिकारात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय व त्यानुषंगाने संबंधितांविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-१२-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) येथे सामाजिक वनीकरण विभागाकाडून साखरखेर्डा ते पिंपळगाव सोनारा या रोपवन स्थळावर सन २०१८ मधील पावसाळ्यात २००० रोपांची लागवड करण्यात आली होती. सदर रोपवनाकरीता सन २०१७-१८ ते २०२०-२१ या कालवधीमध्ये एकूण रु.११,९५,९२५/-खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत संबंधीत कार्यालयास माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये प्राप्त झालेल्या अर्जानुषंगाने संबंधित अर्जदारास देण्यात आली आहे.
(२) प्रश्न भाग -१ मधील उत्तरामध्ये नमूद केलेला रु.११,९५,९२५/-खर्च हा साखरखेर्डा ते पिंपळगाव सोनारा या रोपवनांवरच करण्यात आलेला असल्याने चौकशी करणे अथवा कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) विलंब झालेला नाही.

---

## मराठवाड्यात पाणंद रस्त्यांच्या कामांना मान्यता मिळाली नसल्याबाबत

**(२५) ६८५७२ (२५-०८-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाड्यात मातोश्री पाणंद रस्ते योजनामध्ये ११००० कामांपैकी २७०० कामांना प्रशासकीय मान्यता देण्यासाठी टाळाटाळ होत असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे राज्यात बहुतांश ठिकाणी पाणंद रस्त्यांअभावी शेतमाल वाहतुकीसाठी शेतकऱ्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा रस्त्यांना जिल्हा परिषदेने प्रशासकीय मान्यता देवून कामे सुरु करण्याची जबाबदारी गट विकास अधिकारी यांची असूनही त्यांनी मान्यताच दिली नसल्याने कामे सुरु होवू शकली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या सर्व प्रकरणाची शासनाने चौकशी केली आली आहे काय व त्यानुसार संबंधित दोषींवर कारवाई व रस्त्यांची कामे सुरु करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (१७-०१-२०२४) :** (१) नाही, हे खरे नाही.
मराठवाडयातील एकुण ८ जिल्ह्यातील सुमारे १०,१०३ कामांना प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

(२) नाही, हे खरे नाही.
(३) नाही, हे खरे नाही.
मराठवाडयातील ८ जिल्ह्यांमध्ये एकुण ३३९१ कामे सुरु असुन १०५ कामे पूर्ण झाली आहेत. मजुरांमार्फत कामाची मागणीनुसार उर्वरित कामे सुरु करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्ह्यातील अधिकाऱ्यांनी पुनर्वसन जमिनी व भूखंड दुबारा वाटप करून केलेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(२६) ६९३१६ (१२-०९-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील तत्कालीन उपजिल्हाधिकारी पुनर्वसन व तहसीलदार व महसूल विभागातील अधिकाऱ्यांनी सन २०१६ ते २०२० या दरम्यानच्या कालावधीतील पुनर्वसन जमिनी व भूखंड दुबारा वाटप करून सुमारे रु.५०० कोटीचा गैरव्यवहार केल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उसनी व सातारा येथील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना सन १९८८ ते २०१२ या कालावधीत पुनर्वसन कायद्याअंतर्गत वाटप करण्याचे शासनाचे आदेश दिले असूनही अद्याप जमिनीचे वाटप झाले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुनर्वसन कायद्याप्रमाणे एकदा जमिन अथवा भूखंडाचे वाटप केल्यास त्याच प्रकल्पग्रस्तास दुबारा जमीन किंवा भूखंड वाटप करता येत नाही असा कायदा असतानाही तत्कालीन उपजिल्हाधिकारी, अप्पर जिल्हाधिकारी यांनी जमिनीचे व भूखंडाचे फेर वाटप केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अनिल पाटील (२४-०१-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) पुनर्वसन अधिनियमानुसार प्रकल्पबाधत व्यक्तींना एकदाच जमिन व भुखंडाचे वाटप करण्यात येते. सोलापुर जिल्हाधिकारी कार्यालयात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी केली असता काही प्रकरणात दुबार वाटप केल्याचे निदर्शनास आले आहे. सदरचे दुबार वाटप आादेश रद्द करण्यात आले आहे.
(४) सदर प्रकरणी तत्कालीन जिल्हा पुनर्वसन अधिकारी, सोलापुर यांची महाराष्ट्र नागरी सेवा नियम ८ अंतर्गत विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे. तसेच तत्कालीन मंडळ अधिकारी यांचेवर निवृत्तीवेतन काढुन टाकणेबाबत शास्ती दिलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अगस्ती सहकारी साखर कारखाना (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथे ऊसाची रक्कम देण्याबाबत**

**(२७) ६९५८५ (२९-०८-२०२३). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अगस्ती सहकारी साखर कारखाना (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथे सन २०२१-२०२२ या कालावधीतील ऊसाची बाकी असलेली रक्कम देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २० जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२३-११-२०२३) :**(१) होय.
(२) हंगाम २०२१-२२ मध्ये कारखान्याने ६,२२,६०० मे.टन ऊसाचे गाळप केले असून साखर उतारा ११.२६ % आहे. हंगाम २०२१-२२ ची कारखान्याची ढोबळ एफआरपी रू. ३२६५.४०/- प्रमेट असून त्यामधून ऊस तोडणी व वाहतूक खर्च रू. ७६५.१३ प्रमेट वजा जाता निव्वळ एफआरपी रू. २५००.२७ प्रमेट प्रमाणे एकूण देय रक्कम रू.१५५६६.६८ लाख असून कारखान्याने रू.१५५६६.६८ लाख पेमेंट अदा केले आहे. तथापि, कारखान्याने इगतपूरी, सिन्नर व नाशिक परिसरातील ६२३ ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या ऊसाला ऊस (नियंत्रण), आदेश १९६६ मधील कलम ३(३) नुसार ऊस उत्पादक शेतकऱ्यांना रास्त व किफायतशीर दर (एफआरपी) अदा करणे आवश्यक असताना ६२३ ऊस उत्पादक शेतकऱ्यांना एफआरपीपेक्षा कमी दर म्हणजेच ५८१५८.५८० मे.टन ऊसाला रू.१००/- प्रमेट प्रमाणे रक्कम रू.५८,१५,८५८/- अदा केली आहे.

कारखान्याने संबंधित ऊस पुरवठादार शेतकऱ्यांना ५८,१५८,.५८ मे. टन ऊसाची एफआरपीची रू.२००/- प्रमेट प्रमाणे रक्कम रू.१,१६,३१,७१६/- अद्याप वर्ग केलेली नसल्याने कारखान्याविरूध्द ऊस (नियंत्रण) आदेश १९६६ मधील कलम ३ (३) नुसार आयुक्तालय स्तरावर सुनावणीची कार्यवाही चालू आहे, असे साखर आयुक्त, पुणे यांनी कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात शासकीय आश्रम शाळांमधील शिक्षकांची पदे भरण्याबाबत

**(२८) ७१७५३ (११-१२-२०२३). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात आदिवासी विकास विभागांतर्गत शासकीय आश्रम शाळांमध्ये मोठ्या प्रमाणात पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी विकास विभागाच्या अहवालानुसार शासकीय आश्रम शाळांमध्ये प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षकांच्या मंजूर ४,२२० पदांपैकी २,०५७ म्हणजेच ४८.७४ टक्के पदे रिक्त असून अनुदानित आश्रम शाळांमधील शिक्षकांच्या रिक्त पदांचे प्रमाण १० टक्के असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिक्षण हक्क कायदा, २००५ नुसार आश्रमशाळांमधील मुला व मुलींना गुणवत्ता शिक्षण देणे बंधनकारक असताना अनेक आश्रमशाळांमध्ये विषय शिक्षकच उपलब्ध नसल्याने अशा शाळांचा भार रोजंदारी कर्मचाऱ्यांवर येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मोठ्या प्रमाणात रिक्त पदांमुळे शिक्षकांअभावी आदिवासी विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शिक्षकांची पदे तातडीने भरण्याबाबत लोकप्रतिनिधींनी वारंवार निवेदने देऊनही यासंदर्भात कोणतीही कार्यवाही झाली नाही,
(६) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (१५-१२-२०२३) :**(१) व (२) हे, खरे नाही.

शासकीय आश्रमशाळेतील प्राथमिक व माध्यमिक शिक्षक संवर्गात एकूण ४८४८ पदे मंजूर असून ३४६६ पदे भरलेली आहेत व १३८२ पदे रिक्त आहेत. रिक्त पदांची टक्केवारी २८.५% आहे.

अनुदानित आश्रमशाळेतील प्राथमिक व माध्यमिक शिक्षक संवर्गातील एकूण ५४६८ पदे मंजूर असून ४९५५ पदे भरलेली आहेत व ५१३ पदे रिक्त आहेत. रिक्त पदांची टक्केवारी ९ % आहे.
(३) व (४) आदिवासी विकास विभागाच्या ज्या शासकीय आश्रमशाळेत प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांची पदे रिक्त आहे अशा आश्रमशाळेमध्ये विद्यार्थांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून तासिका तत्वावर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येते.
(५) व (६) आयुक्त कार्यालय, आदिवासी विकास, नाशिक यांचेमार्फत सरळसेवेद्वारे पेसा क्षेत्रातील पदे वगळून विविध संवर्गातील एकूण ६०२ रिक्त पदांची जाहिरात दि.२३.११.२०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरात साडेतीनशे कोटीच्या जागेची पाचशे रुपयांच्या मुद्रांकावर दस्त नोंद केल्याबाबत**

**(२९) ७१७७३ (११-१२-२०२३). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे, पिंपरी, चिंचवड व नवघर प्राधिकरणातील हवेलीच्या दुय्यम निबंधक कार्यालय क्र. २४ मधील कार्यालयात बाणेर येथील एका सोसायटीच्या जागेच्या खरेदी प्रकरणी नोंदविण्यात आलेल्या दस्तावेजात संबंधित मालमत्ता ३५० कोटी रुपयांची असून त्यावर २४ कोटी ९० लाख १५ हजार ८०० रुपयांचा मुद्रांक शुल्क आकारणे आवश्यक असताना सह दुय्यम निबंधक यांनी केवळ ५०० रुपयाच्या मुद्रांक शुल्कावर दस्त नोंदवून शासनाचा २५ कोटी रुपये महसूल बुडविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी दोषी सह दुय्यम निबंधकास दिनांक १९ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास सेवेतून निलंबित करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या अगोदर देखील अशाप्रकारे संगनमताने व्यवहार करुन शासनाचा महसूल बुडविल्यासंदर्भात झालेल्या नोंदणींची चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी करुन दोषींवर कडक कारवाई करणेसह मिळकत खरेदी विक्री हस्तांतरणानंतर दस्तावेज नोंदणीबाबतचे सर्व व्यवहार दर सहा महिन्यांनी पडताळणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१३-१२-२०२३) :** (१) व (२) होय हे खरे आहे.
(३) व (४) सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी,पुणे शहर यांचे आदेश क्र.सजिनि/ पु.श./वि.तपासणी/ १६१९९/२०२३, दिनांक १६.११.२०२३ अन्वये श्री.भातंबरेकर (सध्या निलंबित) हे पदोन्नतीने नियुक्त झालेल्या दिनांकापासून म्हणजेच दिनांक ८/०९/२०२२ ते दिनांक १६/१०/२०२३ पर्यत त्यांनी नोंदविलेल्या दस्तांची विशेष तपासणी करण्याकरिता एकूण १२ पथके (प्रती पथक एक महिन्याचा कालावधी) या प्रमाणे नियुक्त करण्यात आलेली

आहेत. तपासणी पथकामार्फत उपरोक्त नमूद कालावधीत नोंदविलेल्या दस्तांची तपासणीचे काम चालू असून तपासणी पथकाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात पालघर जिल्ह्यातील चिकू, नारळ व आंबा बागायतदार विमा योजनेपासून वंचित असल्याबाबत

**(३०) ७१८१० (११-१२-२०२३). श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील चिकू बागायतदार मागील दोन वर्षापासून विमा योजनेपासून वंचित असल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सन २०१६ मध्ये चिकू फळ पिक विमा योजनेत शेतकऱ्यांकडून तीन हजार रुपये हप्ता घेऊन हेक्टरी ५५ हजार रुपयांचे विमा कवच देण्यात येत होते, तथापि, सन २०२१ पासून चिकू विमा हप्ता सात पटीने वाढल्याने ९०% चिकू बागायतदार विम्यापासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चिकू व नारळ बागायतदारांना भरपाई देण्याबाबत शेतकऱ्यांनी मा.कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन तसेच लोकप्रतिनिधी व बागायतदारांनी विमा हप्ता कमी करण्याची वा विमा हप्त्यासाठी शासकीय अनुदान देण्याची मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच पालघर जिल्ह्यातील चिकू, नारळ व आंबा उत्पादक शेतकऱ्यांना विमा कवच देण्यासंबंधी कोणती उपाययोजना केली आहे,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार निवेदन व मागणीच्या अनुषंगाने तसेच पालघर जिल्ह्यातील चिकू, नारळ व आंबा उत्पादक शेतकऱ्यांना विमा कवच देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा कोणत्या उपाययोजना करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१५-१२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) होय, हे अंशत: खरे आहे.

(४) व (५) पुनर्रचित हवामान आधारीत फळपिक विमा योजनेमध्ये चिकू व आंबा या फळपिकाचा समावेश आहे. या योजनेसाठी सन २०२४-२५ करीता विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करून नव्याने ई-निविदा काढताना विमा दर कमी करणेबाबत विचार करण्यात येईल.

तसेच महाराष्ट्र राज्यात सन २०२३-२४ या वर्षाकरिता नारळ विकास मंडळ, कोची पुरस्कृत नारळ विकास योजने अंतर्गत नारळ पिक विमा या घटकाचा समावेश आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कर्नाळा (ता.पनवेल, जि.रायगड) नागरी सहकारी बँकेतील खातेदार व ठेवीदारांच्या ठेवी मिळण्यासाठी व सक्षम प्रधिकाऱ्यांची नेमणूक करण्याबाबत

**(३१) ७२१७१ (११-१२-२०२३).श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :**सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) कर्नाळा (ता.पनवेल, जि.रायगड) नागरी सहकारी बँकेत झालेल्या गैरव्यवहारानंतर खातेदार व ठेवीदारांच्या ठेवी अद्यापही मिळाल्या नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठेवीदारांच्या रुपये पाच लाख पर्यंतच्या ठेवी विमा कंपनीकडून परत देण्यात आल्या असून ५ लाखावरील ठेवी असणाऱ्या ठेवीदारांना त्यांची रक्कम अद्यापही परत मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी व इतरांच्या जप्त केलेल्या मालमत्तेचा लिलाव करुन उर्वरीत रक्कम ठेवीदारांना परत देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जप्ती आणलेल्या वित्तीय संस्थेच्या मालमत्तेचा लिलाव करण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याची नेमणूक केली नसल्यामुळे मालमत्तेचा लिलाव करुन ठेवीदार व खातेदार यांना त्यांच्या ठेवी मिळण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन ठेवीदारांच्या रक्कमा तात्काळ परत करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१५-१२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) कर्नाळा नागरी सहकारी बँक लि., दिनांक १७.०८.२०२१ रोजी अवसायनात घेतली आहे. डी.आय.सी.जी.सी कडून ३८,६३९ ठेवीदारांना रु.३७७.७२ कोटी मंजुर करण्यात आले असून त्यापैकी २३,६८९ ठेवीदारांना रु.३५१.५८ कोटी रक्कम अदा करण्यात आली आहे.

त्यापैकी ५ लाखावरील ठेवी असलेल्या २८५८ ठेवीदारांना रु. ५ लाख या मर्यादेत रु. १४०.९१ कोटी अदा करण्यात आले असून ५ लाखाच्या आतील ठेवी असलेल्या २०४०४ ठेवीदारांना रु. २३०.८३ कोटी इतकी रक्कम अदा केली आहे.

(३), (४) व (५) बँकेतील एकूण ६३ कर्ज प्रकरणात झालेल्या गैरव्यवहार प्रकरणी बँकेचे तत्कालीन संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी व कर्जदार अशा एकूण ६३ जणांवर दिनांक १७.०२.२०२० रोजी गुन्हा क्र.७८/२०२० दाखल करण्यात आला असून त्याबाबतचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभाग करत आहे.

राज्य गुन्हे अन्वेषण विभागाने कर्नाळा बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित व्यक्ती यांच्या मालमत्ता महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थामधील) हितसंरक्षण अधिनियम, १९९९ मधील तरतुदीनुसार जप्त केल्या आहे. बँकेतील गैरव्यवहाराच्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाच्या कलम ८८ अन्वये चौकशी करण्यात आली असून संचालक, अधिकारी/कर्मचारी अशा २० जणांवर रु.५२९.३६ कोटी रकमेची जबाबदारी निश्चित केली असून त्यानुसार वसुली प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले आहे.

श्री. विवेकानंद शंकर पाटील व श्री. अभिजीत विवेकानंद पाटील या दोन अपचा-यांवर रु. ५२९.३६ कोटी रक्कमेची जबाबदारी निश्चित करण्यात आली असून उर्वरीत १८ अपचारी यांच्यावर प्रत्येकी रु.१०,०००/- रक्कमेची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे.

यापैकी उपरोक्त नमुद १८ अपचारी यांनी त्यांच्यावर प्रत्येकी निश्चित केलेली रक्कम रु. १०,०००/- चा भरणा बँकेत केला आहे.

बँकेने जप्त केलेल्या रक्कमा व अन्य मालमत्ता यावर नियंत्रण ठेवण्याकरीता उपविभागीय अधिकारी, पनवेल यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ मधील तरतुदीनुसार गृह विभागाच्या दिनांक २९/११/२०२२ रोजीच्या आदेशान्वये बँकेचे तत्कालीन अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक, सीईओ व इतर संबंधित व्यक्ती यांच्या ८७ स्थावर मालमत्ता १२ वाहने जप्त करण्यात आल्या असून १९३ बँक खाती गोठविण्यात आली आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

## सिडको हद्दीत आदिवासी वाड्यांमधील कुंटुंबे मुलभूत सुविधापासून वंचित असल्याबाबत

**(३२) ७२२३८ (११-१२-२०२३). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आदिवासी पाड्यांमध्ये राहणाऱ्या अनेक आदिवासी कुटुंबियांची घरे शासनाच्या मालकीची असल्यामुळे त्यांच्या नावाने जातीचा दाखला, आधार कार्ड, रेशनिंग कार्ड ही आवश्यक कागदपत्रे काढता येत नसल्याने त्यांना मुलभूत सुविधा व शासनाच्या विविध योजनांपासून वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील सिडको हद्दीत सुमारे २५० हून अधिक आदिवासी कुटुंबे १६ वाड्यामध्ये पिढ्यानपिढ्या वास्तव्यास असून आदिवासींनी केलेल्या मागण्यानंतर शासनाने शासकीय जागेवरील आदिवासींच्या राहत्या घराखालील जागा त्याच्या नावे करुन त्या ठिकाणी मुलभूत सुविधा देण्याचा निर्णय घेतला असून दिनांक २२ मार्च, २०१६ रोजी वा त्यासुमारास तत्कालीन मा.राज्यपालांनी आदेश पारित करताना त्याची अंमलबजावणी मा.विभागीय आयुक्त कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली करण्याचे निदेश दिले असतानाही त्याची अंमलबजावणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच मुंबई, मिरा-भाईंदर, नवी मुंबई, ठाणे, पालघर, नाशिक, रायगड यासारख्या शहरी भागात राहणा-या अनेक आदिवासी कुटुंबांना घरकुल योजनेचा लाभ देण्यासंदर्भात स्थानिक यंत्रणेने कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करुन आदिवासी कुटुंबांना दिलासा देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-१२-२०२३) :** (१) पनवेल तालुक्यातील सिडको हद्दीतील आदिवासी वाडयातील कुटूंबांचे तहसिलदार, पनवेल यांचेमार्फत केलेल्या सर्वेक्षणानुसार सिडको महामंडळाच्या अधिसूचित क्षेत्रामध्ये एकूण २४ आदिवासी वाड्यांमधील सुमारे ५२९ आदिवासी लोकांची घरे असल्याचे निदर्शनास आले आहे. सदरची घरे खाजगी मालकीच्या जागा, वन जमीन व सिडको संपादित जमिनीवर अतिक्रमणे करुन बांधण्यात आली आहेत. सिडकोमार्फत विकसित झालेल्या पायाभूत सुविधा आदिवासी वाड्यांसभोवताली उपलब्ध असल्याने त्यांचेकडून सदर पायाभूत सुविधांचा वापर करण्यात येत आहे. तसेच पनवेल तालुक्यातील कुंडेवहाळ, करंजाडे, वहाळ व गव्हाण या गावातील ११ आदिवासी / कातकरी वाड्या पक्क्या तसेच कच्च्या रस्त्याने जोडलेल्या आहेत.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील आदिवासी वाड्यांमधील वस्त्यांमध्ये पाणी पुरवठा, दिवाबत्ती, सार्वजनिक स्वच्छतागृह व पदपथ या सुविधांची कामे महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहेत.

(२) महसूल व वन विभागाच्या दिनांक २७.०६.२०१६ रोजीच्या पत्रान्वये अनुसूचित जमाती प्रवर्गातील कातकरी समाजाच्या व्यक्तींच्या घराखालील शासकीय, गावठाण, गुरुचरण जमिनीवरील अतिक्रमणांचा शोध घेणे व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ५१ व महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम, १९७१ च्या नियम ४५ मधील तरतुदीनुसार चौकशी करुन छाननीअंती पात्र ठरलेल्या शासकीय जमिनीवरील कातकरी व्यक्तींने केलेले अतिक्रमण नियमानुकूल करण्यासाठी निर्देश दिले आहेत. त्यानुषंगाने पनवेल तालुक्यातील कातकरी जमातीच्या घरांच्या जागेबांबत प्रकरणांचा गुणवत्तेवर तपास करुन सर्वेक्षणाअंती सरकारी जागेत, गावठाण जागेत व वन जमिनीवर केलेले अतिक्रमणे नियमित करण्याची कार्यवाही करण्यात येते.

(३) व (४) "सर्वांसाठी घरे" या संकल्पनेवर आधारित पंतप्रधान आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटक / अल्प उत्पन्न गट / मध्यम उत्पन्न गट असणाऱ्या व पक्की घरे नसणाऱ्या पात्र व्यक्तींना लाभ देण्यात येतो.

तसेच आदिवासी विकास विभागामार्फत "शबरी आदिवासी घरकुल योजना" याअंतर्गत पात्र आदिवासी लाभार्थ्यांना लाभ देण्यात येतो.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खारफुटीचे क्षेत्र वन विभागाकडे सोपविण्याबाबतचा आदेश मा.उच्च न्यायालयाने दिले असल्याबाबत

**(३३) ७२२४९ (१०-०२-२०२४). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व):** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात खारफुटीचे क्षेत्र मोठ्या प्रमाणावर असून खाजगी मालकीच्या जमिनींना जंगल म्हणून घोषित करुन १२ आठवड्यांच्या कालावधीत त्या जमिनी वनविभागाकडे सुपूर्द करण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने दिनांक १७ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच खारफुटीचे क्षेत्र वनविभागाकडे सोपविण्याबाबतचा २०१८ च्या आदेशाचे उल्लंघन झाल्याचे निरीक्षण नोंदवून सरकारी प्राधिकरणांनी सद्य:स्थितीचे तपशीलवार प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे आदेश मा.उच्च न्यालयाने दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर खारफुटीच्या जागांच्या सद्य:स्थितीचा तपशील प्रतिज्ञापत्राद्वारे सादर करण्याचे आदेशही मा.उच्च न्यायालयाने यावेळी शासन, सिडको, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व इतर नियोजन प्राधिकरणांना दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-०२-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार कांदळवन क्षेत्राची पडताळणी करुन विभागीय आयुक्त, कोंकण यांच्याव्दारे व सिडकोव्दारे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चेंबूर (मुंबई) येथील दि ब्ल्यु पिपल्स सहकारी पदसंस्थेच्या कार्यकारी मंडळाने आर्थिक गैरव्यवहार केल्याबाबत

**(३४) ७२५०९ (११-१२-२०२३). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चेंबूर (मुंबई) येथील दि ब्लु पिपल्स सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष व इतर पदाधिकाऱ्यांकडून सन २०१२-१३ ते २०१६-१७ या आर्थिक वर्षात कोणत्याही कागदपत्रांची पूर्तता व तारण न ठेवता सुमारे १४ कोटी रुपयांची रक्कम स्वत:च्या तर काही खाजगी कंपनीच्या खात्यामध्ये वळविण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खाजगी कंपनीत आर्थिक गैरव्यवहार केल्याचे सहकार विभागाने केलेल्या लेखा परिक्षणात

निदर्शनास आल्यानंतर सदरहू पतसंस्थेच्या ११ पदाधिकाऱ्यांविरुद्ध चेंबूरच्या आर.सी.एफ. पोलीस ठाण्यात दिनांक १३ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास गुन्हे दाखल करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार मालमत्ता व घोटाळ्याची रक्कम जप्त करुन संबंधित दोषी पदाधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१५-१२-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे

दि ब्लु पिपल्स सहकारी पतसंस्था मर्या., चेंबूर (मुंबई) या पतसंस्थेच्या सन २०१२ ते २०१७ च्या फेरलेखापरिक्षण अहवालानुसार संस्थेमध्ये रु.१३,५७,५४,५८८/- एवढया रकमेचा अपहार झाल्याचे नमूद करण्यात आले आहे.
(२) व (३) सदर संस्थेच्या सर्व संचालक मंडळ व व्यवस्थापक (एकुण ११ व्यक्ती) यांचेविरुध्द गुन्हा क्र.६००/२३ अन्वये दिनांक १६/१०/२०२३ रोजी पोलीस स्टेशन, चेंबूर येथे गुन्हा नोंदविला आहे. त्यापैकी एका व्यक्तीला अटक झाली आहे.

लेखापरीक्षण अहवालानुसार सदर पतसंस्थेची आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये चौकशी सुरु करण्यात आली असुन त्याकरीता श्री. एस.यु. बनसोडे, उपनिबंधक, सहकारी संस्था, एम विभाग, मुंबई यांची सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दिनांक ०६/०९/२०२३ रोजीच्या आदेशान्वये प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात वन्यजीवांच्या हल्ल्यात निष्पाप नागरिकांचा व जनावरांचा बळी गेल्याबाबत**

**(३५) ७२७४७ (११-१२-२०२३). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनेक ठिकाणी वाघ, बिबट्या, हत्ती, रानडुक्कर व इतर वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात शेकडो नागरिक व पशुधनांचा बळी गेला असून शेतीच्या पिकांचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वन्यप्राण्यांचे हल्ले थांबविण्यासाठी परिसरात पिंजरे लावणे, जंगल व जंगलाबाहेरही वन्यप्राण्यांचे व्यवस्थापन तसेच टास्क फोर्स तयार करण्याची मागणी अनेक लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात होणारी जीवित व वित्त हानी टाळण्यासाठी शासनाने कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, वन्यप्राण्यांच्या हल्ल्यातील जखमी व मृतकांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-१२-२०२३) :** (१) सन २०२२-२३ मध्ये राज्यात वन्यप्रण्यांच्या हल्ल्यात मनुष्य हानीच्या १११, पशुधन हानीच्या १८११८ व शेतपिक नुकसानीच्या ९३५१५ घटना निदर्शनास आल्या आहेत.

तसेच सन २०२३-२४ मध्ये (आजतागायत) राज्यात वन्यप्रण्यांच्या हल्ल्यात मनुष्य हानीच्या ४४, पशुधन हानीच्या ११०३३ व शेतपिक नुकसानीच्या ५६४०० घटना निदर्शनास आल्या आहेत
(२) होय हे खरे आहे.
(२) मानव-वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्या अनुषंगाने क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

• उन्हाळयात वन्यप्राण्यांना वनातच पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे याकरीता वनतलाव, खोदतळे, कृत्रिम पाणवठ्यांची निर्मीती करण्यात येते व त्यामध्ये बारमाही पाणी उपलब्ध राहील याची काळजी घेण्यात येते.
• वनलगत असलेल्या गावांमध्ये मानव वन्यप्राणी संघर्षाच्या वेळी घ्यावयाच्या खबरदारीबाबत जनजागृती करण्यात येते.
• वन्यप्राण्यांमुळे अतिप्रसंग उद्भवल्यास जलद बचाव पथकाच्या (Rapid Rescue Unit) सहाय्याने प्रचलित नियमातील तरतुदीनुसार सदर वन्यप्राण्यास जेरबंद करुन नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यात येते.
• नैसर्गिक भक्ष्य असलेल्या तृणभक्षी वन्यप्रण्यांना वनातच गवत / चारा उपलब्ध होण्याकरीता कुरण विकासाची कामे करण्यात येतात.
• वन्यप्राण्यांमुळे शेतपिकांचे, पशुधनाचे नुकसान तसेच मन्युष्य जखमी किंवा मृत्युमुखी पडल्यास प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यास नुकसान भरपाई अदा करण्यात येते.
• वन्यप्राण्यांनी केलेल्या नुकसानीची भरपाई अदा करण्याकरीता उणे (-) प्राधिकाराची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
• वनालगतच्या ग्रामस्थांचे वनावरील अवलंबत्व कमी व्हावे यासाठी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना राबविण्यात येत असुन त्यात एल.पी.जी. गॅस पुरवठा, बायोगॅस, र्निधुर चुली, सोलर दिवे इत्यादी उपक्रम राबविण्यात येतात.
(४) सद्यस्थितीत दिनांक ०३.०७.२०२३ रोजीच्या प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत व्यक्तीच्या कायदेशीर वारसास व जखमी व्यक्तीस अर्थसहाय्य अदा करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात अनेक जिल्ह्यांमध्ये बोगस व निकृष्ट बियाणांची विक्री होत असल्याबाबत**

**(३६) ७२८२४ (११-१२-२०२३). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती नमिता मुंदडा (केज), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मोठ्या प्रमाणात बनावट व निकृष्ट बियाण्यांची विक्री होत असल्याने शेतकऱ्यांची फसवणूक होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कृषि विभागाच्या पथकाने अनेक ठिकाणी धाडी टाकून विविध बियाणे कंपन्यांचे ५८४ नमुने तपासणीसाठी घेतले असता त्यापैकी ६४ कंपन्याचे नमुने अप्रमाणित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनेक ठिकाणी बनावट व निकृष्ट बियाणे तपासण्याची कोणतीही यंत्रणा स्थानिक पातळीवर उपलब्ध नसल्याने देखील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अशी बियाणे तपासण्यासाठी ठिकठिकाणी प्रयोगशाळा निर्माण करुन आवश्यक तो तांत्रिक कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, अशा प्रकरणांवर आळा घालण्यासाठी कायदे अधिक कठोर करुन त्याची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१५-१२-२०२३) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
माहे ऑक्टोबर २०२३ अखेर एकूण २०३८८ बियाणे नमुने काढण्यात आले असून त्यामधील तपासण्यात आलेल्या नमुन्यांपैकी एकूण ८६३ नमुने अप्रमाणित आले आहेत. यासंदर्भात बियाणे कायदा, १९६६ नुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) हे खरे नाही.
राज्यात ३ शासकीय बीज परीक्षण प्रयोगशाळा, महाबीज २ प्रयोगशाळा व बीज प्रमाणीकरण यंत्रणेच्या २ अशा एकूण ७ बीज परीक्षण प्रयोगशाळा असून त्यांचे मार्फत बियाणे नमुने तपासणी केली जाते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
सर्व शासकीय प्रयोगशाळामध्ये तांत्रिक कर्मचारी वर्ग उपलब्ध आहे.
(५) शेतकऱ्यांना भेसळयुक्त निविष्ठा प्रकरणी नुकसान भरपाई मिळण्यासाठी नव्याने कायदा करण्याकरिता "भेसळयुक्त, अप्रमाणित किंवा गैरछापाची बियाणे, खते किंवा किटकनाशके यांच्या विक्रीमुळे व वापरामुळे झालेल्या नुकसानीकरिता शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी विधेयक, २०२३", या प्रकारच्या गुन्ह्याबाबत शिक्षेत वाढ करण्याकरीता "बियाणे कायदा (राज्य सुधारणा) विधेयक, २०२३" आणि बियाणे, खते व किटकनाशके विषयक वारंवार अपराध करणाऱ्या अपराध्यांच्या व्याख्यांचा समावेश करणेकरिता "महाराष्ट्र विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२३", ही प्रस्तावित तीन विधेयके अनुक्रमे क्र. ४०, ४२ व ४४ विधीमंडळाच्या मान्यतेकरीता सादर करण्यात आलेली असून सदर विधेयके विधीमंडळाच्या संयुक्त समितीच्या विचारार्थ पाठविण्यात आलेली आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उरण, ठाणे व रायगड किनारपट्टीवर तसेच पश्चिम उपनगरातील वर्सोवा येथे कादंळवनाचे सर्वेक्षण पूर्ण होऊन सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत

**(३७) ७३२६८ (११-१२-२०२३). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उरण, वर्सोवा, ठाणे व रायगड किनारपट्टीवरील कांदळवन विविध पायाभूत प्रकल्प तसेच अनधिकृत भरावामुळे मोठ्या प्रमाणात नष्ट होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नष्ट होणाऱ्या कांदळवनाची काटेकोर पद्धतीने तपासणी व देखरेख करण्यासंदर्भातील मागणी नेटकनेक्ट फाऊंडेशनने केली असता या प्रकरणी चौकशी करुन वन विभागाने अहवाल सादर करण्याचे आदेश केंद्र शासनाने दिनांक २५ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास दिले, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील १०६ कांदळवनांना धोका निर्माण होऊ नये यासाठी वन विभागाने मुंबई महानगरपालिकेच्या मदतीने सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय घेतला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कांदळवन पट्टयात सर्वेक्षण, सीसीटीव्ही व संरक्षण चौक्या तयार करण्याचे काम अद्यापही अपूर्ण आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन कांदळवन संरक्षणासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-१२-२०२३) :** (१) व (२), अंशत: खरे आहे.

अनधिकृत भरावामुळे कांदळवन नष्ट होत असल्याबाबत तक्रारी प्राप्त होत असतात. तसेच "सर्वसाधारण कांदळवन क्षेत्रात होत असलेल्या पायाभूत सुविधांच्या प्रकल्पासंदर्भात कांदळवनाची होणारी तोड व त्यावर असणाऱ्या सनियंत्रण" यासंदर्भात पी.जी.पोर्टल या केंद्रीकृत सार्वजनिक तक्रारीचे निवारण व देखरेख प्रणालीव्दारे श्री.बी.एन.कुमार Netconnect Foundation यांच्याकडून दिनांक २५.८.२०२३ रोजी तक्रार प्राप्त झालेली आहे.

महाराष्ट्रात कांदळवनाचा दर्जा राखीव वन/संरक्षित वन असून सदर कांदळवन क्षेत्रातील पायाभूत सुविधांकरिता वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत प्रस्ताव तयार करुन केंद्र शासनाची परवानगी प्राप्त करणे तसेच मा. उच्च न्यायालयाची कांदळवन वृक्षतोडीबाबत परवानगी घेणे बंधनकारक आहे. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कांदळवन वृक्षांची तोड क्षेत्रीय स्तरावर वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्या निगराणीखाली होत असते. तसेच मा.उच्च न्यायालयाने तोडीकरिता निश्चित केलेल्या कांदळवन वृक्षांपेक्षा अधिकच्या कांदळवन वृक्षांची तोड केली जात नाही. सदर प्रक्रियेत तोड होणाऱ्या कांदळवन वृक्षांबाबत दक्षता घेण्यात येत असल्याने, Netconnect Foundation यांनी तक्रारीत उपस्थित केलेली कांदळवन वृक्षतोडीबाबत संनियंत्रण होत नसल्याची बाब वास्तविक नाही.

(३), (४) व (५) मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील कांदळवन क्षेत्रामध्ये सुरुवातीस १०६ संवेदनशील ठिकाणी सी.सी.टी.व्ही. (CCTV) स्थापित करण्यात येणार होते. तद्नंतर आवश्यक ती शासकीय प्रक्रिया पूर्ण करुन नियुक्त करण्यात आलेल्या तज्ञांच्या अंतिम अहवालानुसार एकूण १३१ ठिकाणी स्थळनिश्चिती करण्यात आली आहे. कांदळवनाचे संरक्षण करण्यासाठी कांदळवन पट्टयात चौकी बनविण्याचे प्रस्तावित नसून मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील भिवंडी, पश्चिम मुंबई, मध्य मुंबई, नवी मुंबई व ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्य ऐरोली या ठिकाणी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्यात येणार असून त्यानुषंगाने सी.सी.टी.व्ही.बाबतचा विस्तृत प्रकल्प आराखडा (DPR) तयार करण्याची प्रक्रिया सुरु आहे. पश्चिम उपनगरातील वर्सोवा येथे एकूण ३ ठिकाणी कांदळवन क्षेत्रात सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे प्रस्तावित आहे. तसेच कांदळवनाकरिता नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत एकूण ९ थर्मल, १३ फिक्स कॅमेरे व ५ पीटीझेड कॅमेरे बसविण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात काही जिल्ह्यात व मराठवाड्यातील कोळी समाजातील जमातीला जात व वैधता प्रमाणपत्र सुलभतेने मिळण्याबाबत

**(३८) ७३४५२ (११-१२-२०२३). श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.रवि राणा (बडनेरा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महादेव कोळी, टोकरी कोळी, मल्हार कोळी, ढोर कोळी या अनेक वर्षापासून राहत असून त्यांना जात प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र मिळण्यास अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या जाचक अटींमुळे ही प्रमाणपत्रे वेळेवर उपलब्ध न झाल्यामुळे त्याचा परिणाम सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात होत असून त्यांना विविध शासकीय योजनांपासून वंचित राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात अनेक लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदनाद्वारे मागणी केली असता या जातींचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करण्यासंदर्भात मा.मुख्यमंत्री व मा.आदिवासी मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्यासमवेत दिनांक २० आक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहात बैठक घेतली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जात व वैधता प्रमाणपत्राअभावी राज्यातील अनेक शासकीय सेवेतील पदे अधिसंख्य घोषित करण्यात आली असून विविध शासकीय लाभांपासून सदर कर्मचारी वंचित झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासकीय अधिकाऱ्यांकडून ही जात व वैधता प्रमाणपत्रे देताना मोठ्या प्रमाणात अडवणूक करुन अनेक अटी व शर्ती घालून पूर्ततेअभावी ही प्रमाणपत्रे देण्यास टाळाटाळ व विलंब करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (१५-१२-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.

राज्यामध्ये "महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० (२००१ चा महा. क्र.२३)," तसेच सदर अधिनियमांतर्गत "महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३," मधील तरतुदीनुसार अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात येते.

महाराष्ट्राच्या अनुसूचित जमातीच्या यादितील नमूद अनुसूचित जमातीचा दावा सिध्द करणाऱ्या प्रत्येक अनुसूचित जमातीच्या व्यक्तीस जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र प्राप्त होते. उक्त अधिनियम व नियमांतील जात प्रमाणपत्र निर्गमित करावयाच्या तरतुदी या सर्व अनुसूचित जमातींना समान लागू आहेत.
(३) हे खरे आहे.
(४) अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यामुळे सेवामुक्त केलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर नियुक्ती देण्याचे आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २१.१२.२०१९ च्या निर्णयान्वये देण्यात आलेले आहेत. तसेच दिनांक १४ डिसेंबर, २०२२ च्या शासन निर्णयान्वये अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांना सेवा विषयक/सेवा निवृत्ती विषयक लाभ मंजूर करण्यात आले आहे.
(५) व (६) हे खरे नाही.

अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी शासनाने अधिनियम, २००० (२००१ चा महा.क्र.२३), तसेच सदर अधिनियमांतर्गत नियम, २००३ तयार केलेले आहे. सदर अधिनियम व नियम अनुसार अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही होते.

उक्त अधिनियम २००० च्या कलम ८ नुसार अनुसूचित जमातीचा दावा सिध्द करण्याची जबाबदारी असा दावा करणाऱ्या अर्जदारावर आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्हयात होत असलेल्या अवैध रेती उत्खननाबाबत**

**(३९) ७३६८२ (११-१२-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण):** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) काल्हेर आलीमघर खाडी (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील खाडीपात्राचा लिलाव झालेला नसतांना महसूल यंत्रणा व

स्थानिक रहिवाश्यांच्या मदतीने खाडी पात्रातून दोन बार्ज तीन सक्शन पंप जप्त केले तरीही वाहने वाळू चोरी करीत असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रेती घाटांचा लिलाव झालेला नसताना तसेच वाळू उपसावर बंदी असताना कल्याण, डोंबिवली, भिवंडी, मुंब्रा, कोन, दिवा व खडवली खाडीकिनारी सक्शन पंपाचा वापर करून रेती उपसा केला जात असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर, डोंबिवली, वांगणी, टिटवाळा, मुरबाड व भिवंडी या शहरातील बांधकाम व्यवसायिकाकडून वाळूच्या वाढत्या मागणीमुळे मोठ्या प्रमाणात वाळूचा अवैध उपसा होत असून शासनाच्या महसूलाचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करून उक्त खाडीपात्रातील वाळूचा अवैध उपसा रोखण्यासह त्यास जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१५-१२-२०२३) :** (१), (२),(३), (४) व (५) मौजे काल्हेर ते आलीमघर खाडी क्षेत्रात अनधिकृत वाळू / रेती उत्खननावर तहसीलदार कार्यालय भिवंडी मार्फत दि. १८/०८/२०२३ रोजी कारवाई करुन २ बार्ज व ३ सक्शन पंप नष्ट केले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे व संबंधीत उपविभागीय अधिकारी व तहसील कार्यालयाच्या दक्षता पथकामार्फत खाडीलगत वेळोवेळी गस्त घालून सक्शन पंप व बार्ज गॅस कटरने कापून व किना-यालगतच्या रेती उपसा करणा-या कुंड्या JCB च्या सहाय्याने नष्ट करण्यात येतात. तसेच, गुन्हे दाखल करण्याची कारवाई करण्यात येते.

जिल्हाधिकारी कार्यालयाकडील दक्षता पथक, उपविभागीय अधिकारी व तहसीलदार कार्यालयामार्फत सन २०२३ मध्ये अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक प्रकरणी एकूण ६० कारवाया करुन ३४ सक्शन पंप, २९ बार्ज, १२१ कुंड्या, १० बोटी व १० इंजिन निकामी केले आहेत. २ क्रेन, ६ बुल डोझर व ४ ट्रक्र/ट्रॅक्टर व ७१८ ब्रास रेतीसाठा जप्त केला आहे. तसेच, १४१ वाहनांवर कारवाई करुन २१८.४५ लक्ष दंडाची वसूली करून १३ गुन्हे दाखल केले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दक्षता पथकाने दि. १२/०९/२०२३ रोजी दिवा मुंब्रा खाडी परिसरात अनधिकृत वाळू / रेती उत्खनन करणाऱ्यांवर कारवाई करून कळवा पोलीस स्टेशन येथे अज्ञात व्यक्तींविरूद्ध गुन्हा दाखल केला आहे.

---

**अंबाजोगाई (जि.बीड) कृषि महाविद्यालय येथील प्रक्षेत्रावर मानवचलीत कृषि-हवामानशास्त्र वेधशाळा उभारण्याबाबत**

**(४०) ७३८२३ (११-१२-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील पाऊस, तापमान आर्द्रता व वाऱ्याचा वेग व दिशा याची अचूक माहिति घेऊन त्याचे निष्कर्ष काढून शेतकऱ्यांना योग्य सल्ला देता यावा यासाठी शासनाच्या महावेध प्रकल्पांतर्गत व इतर संस्थाच्या माध्यमातून ग्रामपंचायतीत स्वयंचलित हवामान केंद्र उभारणीकरिता राज्यातील विशेषत: लातूर, जळगाव, रत्नागिरी, बीड इत्यादी जिल्ह्यांमध्ये कृषी आयुक्तांकडे प्रस्ताव पाठविण्यात आले असून काही ठिकाणी जागेची निवडही करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या यंत्राच्या माध्यमातून मिळणाऱ्या अचूक अंदाज व माहितीमुळे पिकांचे नुकसान होणार नाही तसेच झालेल्या नुकसानीसंदर्भात पिक विमा योजनेंतर्गत शेतकऱ्यांना लाभ देणे फायदेशीर ठरणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त जिल्ह्यांसंदर्भातील प्रस्ताव बऱ्याच कालावधीपासून मंजूरीविना प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्वयंचलित हवामान यंत्र तसेच त्यासाठी आवश्यक निधी तातडीने मिळण्यासंदर्भात अनेक लोकप्रतिनिधींनी निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी करुन यासंदर्भात प्रस्तावांना मंजूरी व निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१५-१२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे आहे.
(५) केंद्र सरकारच्या WINDS प्रकल्पांतर्गत ग्रामपंचायत स्तरावर पर्जन्यमापक बसविण्यासाठी यंत्रणांची तांत्रिक गुणवत्तेच्या आधारे निश्चिती करणेत आलेली आहे. त्यानुषंगाने WINDS (Weather Information Network Data System) प्रकल्पाच्या अंमलबजावणी करणेकरीता यंत्रणांची निवड करणेसाठी निविदा मसुदा अंतिम करणेची कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात रोजगार हमी योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्याबाबत

**(४१) ७४२२३ (११-१२-२०२३). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गत १ कोटी ३० लक्ष मजूर असून शासनाच्या जाचक अटींमुळे यंत्रणा कामे घेण्यास तयार नसल्याने मागील तीन वर्षांमध्ये केवळ ६२ लाख मजुरांनाच काम मिळाले असल्याचे दिनांक २७ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या ऑनलाईन प्रणालीमुळे सदर योजना मागे पडत असल्याचे निदर्शनास येऊन महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेंतर्गत २६६ प्रकारच्या कामांचा समावेश करण्यात आला असला तरी यातील ९० टक्के योजना कार्यान्वित नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन या योजनेंतर्गत जास्तीत जास्त मजूरांना रोजगार मिळण्याच्यादृष्टीने यासाठी असलेल्या जाचक अटी शिथिल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (१२-१२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
राज्यात रोजगार हमी योजनेंतर्गत ३ वर्षापासून ६६.१६ लक्ष मजूर कार्यरत आहेत.
(२) हे खरे नाही,
महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत वैयक्तीक, सार्वजनिक आणि सामूहीक लाभाची एकूण २६६ कामे अनुज्ञेय आहेत.
मनरेगा ही मागणी प्रेरीत योजना असुन मागणी प्रमाणे कामे कार्यान्वित करण्यात येतात.
(३) केंद्र शासनाच्या निदेशानुसार योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्यात येते, शासन निर्णय दिनांक १४/१२/२०२२ नुसार मनरेगा आणि अन्य विभागांच्या योजनांच्या अभिसरणातुन वैयक्तीक / सार्वजनिक / सामूहिक लाभाची कामे घेण्याकरिता सुविधा संपन्न कुटुंब मिशन आणि सर्वांगीण ग्राम समृध्दी योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुरबाड (जि.ठाणे) शहर व तालुक्यात वनजमिनीवर अनधिकृत बांधकाम होत असल्याबाबत**

**(४२) ७४३६५ (११-१२-२०२३). श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड शहर व तालुक्यात वनजमिनीवर साकव, रस्ते, घरे, मंदिर, फार्महाऊस इत्यादींचे अनधिकृत व विनापरवानगी बांधकाम होत असल्याचे दिनांक १४ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास मुरबाड (जि.ठाणे) ग्रामीण भागातील गोरगरीब आदिवासींनी वनजमिनीवर बांधकाम वा भात लागवड केल्यास वन विभागाचे अधिकारी तात्काळ जेसीबी लावून तोडण्याची कारवाई करीत असताना उपरोक्त अनधिकृत बांधकामांवर मात्र विभागाकडून कोणतीही कारवाई होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू बांधकामांवर कारवाई करुन दोषींवर गुन्हे दाखल करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन कोणती अनधिकृत बांधकामे व संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-१२-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

ठाणे जिल्ह्यातील मुरबाड (पूर्व) वनपरिक्षेत्रातील संरक्षित वन सर्व्हे क्र.१३९ च्या क्षेत्रात दिनांक १६.३.२०२३ व दिनांक १७.३.२०२३ च्या दरम्यान अनधिकृतपणे सिमेंट कॉंक्रीट साकवचे बांधकाम झाले असल्याचे आढळून आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) वन विभागाच्या हद्दीतील अनधिकृत बांधकामे तोडण्याबाबतची मागणी अन्याय अत्याचार निर्मूलन समिती यांनी दिनांक १२.५.२०२३ च्या निवेदनान्वये केली आहे.

अनधिकृत सिमेंट कॉंक्रीट साकव बांधकाम प्रकरणी भारतीय वन अधिनियम, १९२७ अन्वये रौ.गु.नं.४/ई/२०२२-२३, दिनांक १८.३.२०२३ रोजी प्रथम गुन्हा नोंदविला आहे व त्यानुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात बोगस खत जप्त केल्याबाबत**

**(४३) ७४७७५ (११-१२-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात गुजरात येथून आलेल्या बनावट रासायनिक खतांची विक्री करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी केंद्राच्या अधिकाऱ्यांच्या संगनमतानेच हा गैरव्यवहार होत असून यासंदर्भात शंकरनगर (पुसद) येथे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने कृषी विभागाने कृषी केंद्राचे संचालक गजानन सुरोशे यांच्या राहत्या घरी दिनांक ३० ऑगस्ट, २०२३ रोजी छापा टाकला असता जवळजवळ ११ लाख किंमतीच्या ८३० खतांच्या पिशव्या आढळून आल्या, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच जळगाव जिल्ह्यातील भादली सोसायटीच्या गोदामात १२ लाख रुपयांचे, धुळे जिल्ह्यातही काही गोदामात लाखो रुपयांचे, मध्य प्रदेशातून महाराष्ट्रात येत असलेल्या जबलपूर येथील गोदामात ६८४ बनावट खतांच्या आढळून आलेल्या पिशव्या जप्त करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन बोगस खतांची विक्रीवर आळा घालणे, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणे तसेच संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१५-१२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे. एकूण ८३० खतांच्या बॅगा जप्त करण्यात आलेल्या असून त्याची अंदाजीत रक्कम रुपये १०,२४,३६०/- आहे. मात्र कृषी केंद्राच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने गैरव्यवहार करण्यात येत नाही.
(३) अंशत: खरे आहे. जळगाव जिल्ह्यातील भादली सोसायटीच्या गोदामात बोगस, बनावट व विनापरवाना आढळून आलेला रु.११.२४ लाख किमतीचा १५.२८ मे.टन खत साठा जप्त करण्यात आलेला आहे. तथापि, धुळे जिल्ह्यात ६८४ रासायनिक खतांच्या बॅगा आढळून आलेल्या नाहीत.
(४) प्रो. प्रा. गजानन सुरोशे, मे. केशव कृषि केंद्र, मेन रोड, पुसद, जि.यवतमाळ यांचेविरुध्द पोलीस स्टेशन, पुसद शहर येथे गुन्हा क्रमांक ०६२०/२३ हा दिनांक ३१.०८.२०२३ अन्वये दाखल करण्यात आलेला आहे. त्यावर पुढील तपास सुरु आहे. एकूण ८३० बॅगा जप्त करण्यात आलेल्या असून त्याची अंदाजीत रक्कम रु.१०,२४,३६०/- आहे.
जळगाव जिल्ह्यात भादली या गावात मे.भादली वि.का. सह सोसायटी लि. भादली ता.जि.जळगाव यांचे गोदामातील बोगस, बनावट व विना परवाना खत साठवणूक केल्याचे आढळुन आल्याने मे. नवभारत / नव किसान बायो प्लान्टेक या कंपनीविरुध्द नशिराबाद पोलीस स्टेशन येथे गुन्हा र.नं.१५३/ २०२३ हा दिनांक २१.०८.२०२३ रोजी दाखल करण्यात आला आहे. संशयीत निविष्ठांचे ५ नमुने घेऊन तपासणीकामी खत नियंत्रण प्रयोगशाळा नाशिक व किटकनाशक प्रयोगशाळा ठाणे येथे पाठविण्यात आले आहेत. रु.११.२४ लाख किमतीचा १५.२८ मे.टन खत साठा जप्त करण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## देवरी (ता.आमगांव, जि.गोंदिया) पंचायत समिती अंतर्गत मनरेगा योजनेअंतर्गत कामे प्रलंबित असल्याबाबत

**(४४) ७४९०३ (११-१२-२०२३). श्री.सहसराम कोरोटे (आमगाव) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवरी (ता. आमगांव, जि.गोंदिया) पंचायत समिती अंतर्गत सन २०२२-२३ मध्ये मनरेगा योजनेअंतर्गत सिमेंट, रस्ता खडीकरण अशी अनेक कामे प्रलंबित असतानाही कामाची देयके अदा करण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी सखोल चौकशी करुन कारवाई करण्याबाबत मा.लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १८ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास मा.प्रधान सचिव, मंत्रालय यांना निवेदन दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करुन संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (१२-१२-२०२३) :** (१) खरे नाही.
(२) लागू होत नाही.
दिनांक१८/१०/२०२३ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे.
(३) गट विकास अधिकारी, देवरी यांच्या अहवालानूसार एकुण २७ कामांपैकी २३ कामे भौतिक दृष्ट्या पूर्ण झाली असून ४ कामे अपूर्ण आहे. या कामांवर कोणतीही कुशल कामाची रक्कम अदा करण्यात आलेली नाही
(४) लागू होत नाही

---

**कांदिवली पूर्व, हनुमान नगर व वडारपाडा येथील भूखंडावर अतिक्रमण केल्याबाबत**

**(४५) ७४९८४ (११-१२-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कांदिवली पूर्व, हनुमान नगर, वडारपाडा व हिंदू स्मशानभूमी समोर असलेल्या १६३ अ/ पै गाव आकुर्ली हा ४३५ चौ. मी. क्षेत्रफळाच्या भूखंडावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण करून भूमाफियांकडून विनापरवाना व्यवसाय तसेच गाळे बांधून त्याची विक्री करण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू भूखंड जिल्हाधिकारी किंवा म्हाडा प्रशासन यापैकी नक्की कोणाच्या ताब्यात आहे याचा देखील संभ्रम निर्माण झाला असल्यामुळे कारवाई करण्यास अडचणी येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठिकाणच्या अतिक्रमणाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व रहिवाश्याकडून वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर भूखंडावरील अतिक्रमण तातडीने दूर करुन यास अतिक्रमणास जबाबदार भूमाफिया व संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१५-१२-२०२३) :** (१), (२), (३) व (४) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे दिनांक १७/०७/१९९१ रोजीचे आदेश व शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग, दिनांक २०/११/१९९१ अन्वये म्हाडातर्फे पंतप्रधान अनुदान प्रकल्पाखाली गलिच्छ वस्ती श्रेणीवाढ कार्यक्रमाची अंमलबजावणी त्वरीत करणे शक्य व्हावे यासाठी प्रश्नांकित मौ. आकुर्ली, ता. बोरीवली येथील ४३५ चौ.मी. झोपडपट्टीने व्यापलेले शासकीय क्षेत्र म्हाडाकडे वर्ग करण्यास मान्यता देण्यात आली होती. सदर जमिनीच्या धारक सदरी "महाराष्ट्र शासन" अशी नोंद आहे. सदर मिळकतीवर पूर्वीपासून झोपडपट्टीचे अतिक्रमण आहे.

सदर ४३५ चौ.मी. जमिनीवरील अतिक्रमणाबाबत उपजिल्हाधिकारी (अति./निष्का.) कार्यालयाकडून दिनांक ०५/०१/२०१७ रोजी एकूण ७७ अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली आहेत. तसेच दिनांक २४/०३/२०१७ रोजी सदर मिळकतीवरील एकूण १५ कच्च्या झोपडयांच्या निष्कासनाची कार्यवाही करण्यात आली आहे. अशाच प्रकारे शासन धोरणाप्रमाणे सदर जमिनीवरील असंरक्षित अतिक्रमणे निष्कासित करण्याची कार्यवाही वेळोवेळी करण्यात येते.

सदर ४३५ चौ.मी. जमिनीवरील अनिवासी गाळे धारकांना उपजिल्हाधिकारी (अति./निष्का.), बोरीवली यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ५० अन्वये दिनांक १८/१०/२०२३ रोजी नोटीसा बजावल्या होत्या. सदर नोटीसीच्या अनुषंगाने झालेल्या सुनावणीमध्ये सदर गाळेधारकांनी त्यांचे गाळे विकत / भाडेपट्टयाने घेतल्याचे सांगितले व करारनामेही सादर केले आहेत.

म्हाडाकडून सदर जमिनीचा मंजूर प्रयोजनासाठी वापर न झाल्याने, शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग, दिनांक २०/११/१९९१ रद्द करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांनी शासनास सादर केला असून, सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वाळू उत्खनन व वाहतुकीसंदर्भात नवीन धोरणाच्या अंबलबजावणीबाबत**

**(४६) ७५२२८ (११-१२-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने रेतीचे डेपो तयार करून नागरिकांना ६०० रुपये प्रतिब्रास दराने रेती उपलब्ध करून देण्याची घोषणा केली असतानाही व्यावसायिकांनी रेतीच्या दरात भरमसाठ वाढ केल्यामुळे नागरिकांवर आर्थिक भूर्दंड पडत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ६०० रुपये दराने रेती देणे अपेक्षित असताना राज्यात अनेक ठिकाणी ८ ते १० हजार रुपये प्रतिब्रास दराने रेती विक्री होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रेती संदर्भात शासनाने ठरविलेल्या धोरणानुसार अनेक अटी शर्तींचे पालन रेती व्यावसायिकांकडून होत नसून त्यातून अवैध रेती उत्खननाचे प्रकार निदर्शनास येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यामुळे घरकुल बांधकाम तसेच बांधकाम व्यावसायिक देखील अडचणीत येत असल्यामुळे या प्रकरणी चौकशी शासनाने ठरवून दिलेल्या दरात रेती उपलब्ध करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१५-१२-२०२३) :** (१), (२), (३), (४) व (५) राज्यातील नागरिकांना स्वस्त दराने वाळू/रेती उपलब्ध करुन देणे व अनधिकृत उत्खननास आळा घालण्याच्या उद्देशाने सर्वंकष धोरण शासनाने निर्गमित केले आहे.

राज्यातील २० जिल्ह्यात ४२७ वाळू घाटाकरीता एकूण ९१ ठिकाणी वाळू डेपोची निर्मिती करुन एकूण ३६२७३९.९ ब्रास वाळू उत्खनन केली आहे. २५४३ घरकूल लाभार्थ्यांना ७,६०१ ब्रास वाळू मोफत, तसेच ३५,५३३ वैयक्तिक लाभार्थ्यांना २,४६,३१३ ब्रास वाळू रुपये ६००/- प्रती ब्रास प्रमाणे उपलब्ध करुन दिली आहे.

गौण खनिजाच्या अवैध उत्खननास व वाहतूकीस आळा घालण्यासाठी महसूल, परिवहन व पोलिस यांच्या संयुक्त पथकामार्फत वेळोवेळी कारवाया करण्यात येतात.

राज्यात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक प्रकरणी दिनांक ३०.०६.२०२२ ते दिनांक १५.१०.२०२३ या कालावधीत एकूण १०५२६ प्रकरणात ४३५.४९ कोटी इतक्या दंड आकारुन ११८० गुन्ह्यांमध्ये ६७८ अारोपींना अटक केली आहे.

---

## अमरावती, अकोला व बुलढाणा या जिल्ह्यामध्ये पानपिंपळीच्या अनुदानातील जाचक अटी दूर करुन सुलभ पद्धतीने शेतकऱ्यांना अनुदान देण्याबाबत

**(४७) ७५६३५ (११-१२-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती, अकोला व बुलढाणा या जिल्ह्यामध्ये गत अनेक वर्षापासून परंपरागत पद्धतीने पानपिंपळी या औषधी पिकांची लागवड होत असून त्या भागात मोठ्या प्रमाणात पानपिंपळीचे उत्पादन होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पानपिंपळी पिकाला सन २००७-०८ पासून रोहयो अंतर्गत सुरु असलेले अनुदान सन २०११ मध्ये बंद पडल्यामुळे शेतकऱ्यांनी केलेल्या आंदोलनामुळे सदर अनुदान पूर्ववत सुरु झाले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कृषी विभागाकडून या पिकासाठी लक्ष्यांकाची मागणी केली नसल्याने अनुदानाला पुन्हा अडथळा निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सन २०१९-२० मध्ये पानपिंपळीला मिळणारे अनुदान रोहयोऐवजी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेंतर्गत देण्यात येत असून त्यास जॉब कार्डची अट ठेवण्यात आल्यामुळे व ९९% शेतकरी हे शहरी भागातील असल्याने त्यांना जॉब कार्डअभावी हे अनुदान मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन उपरोक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (१५-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या आयुष विभागामार्फत १२ व्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत सन २०१५-१६ पासून सन २०१९-२० पर्यंत राष्ट्रीय आयुष अभियानामार्फत पानपिंपळीकरिता अनुदान देण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

औषधी वनस्पती लागवड योजनेअंतर्गत सन २०१६-१७, सन २०१८-१९, सन २०२०-२१ व सन २०२१-२२ करिता आयुष मंत्रालयाकडून मंजुरी मिळालेली नाही.

(४) अंशत: खरे आहे.

राष्ट्रीय आयुष अभियान - औषधी वनस्पती लागवड घटक पानपिंपळी या औषधी वनस्पतीसाठी सन २०१९-२० मध्ये अर्थसहाय्य देण्यात आले आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महसूल विभागांतर्गत काही जिल्ह्यांतील लाखो हेक्टर वनजमिनी वन अभिलेख्यातून गहाळ झाल्याबाबत**

**(४८) ७६५३१ (१३-०२-२०२४). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महसूल विभागांतर्गत बुलढाणा, अकोला, अमरावती व यवतमाळ या जिल्ह्यांतील १.९२ लाख हेक्टर वनजमीन वन अभिलेखातून गहाळ झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००१ ते २०२३ या २२ वर्षांच्या कालावधीत मुख्यवनसंरक्षक व उपवनसंरक्षकांनी ही वनजमीन परत मिळविण्यासाठी प्रयत्न केले नसल्याने वन विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेवून वनजमीन ताब्यात घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-०२-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.

महाराष्ट्र शासनाच्या वार्षिक प्रशासन अहवालानुसार सन १९९९ च्या तुलनेत सन २०२२-२३ मध्ये महाराष्ट्र राज्याच्या एकूण वनक्षेत्रात घट झालेली नाही. तसेच अमरावती महसूल विभागांतर्गतच्या अमरावती, अकोला, बुलढाणा व यवतमाळ या जिल्ह्यातील वनक्षेत्रामध्ये सन १९९९ च्या तुलनेत सन २०२२-२३ मध्ये सुमारे १५२.८५८ चौ.कि.मी. ने वाढ झालेली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबत**

**(४९) ७७१३१ (११-१२-२०२३). डॉ.राजेंद्र शिंगणे (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महसूल विभागाच्या अखत्यारितील सर्व प्रकारच्या शासकीय जमिनीवर निवासी प्रयोजनासाठी अतिक्रमण केलेल्या आणि प्रधानमंत्री आवास योजनेसाठी पात्र असलेल्या अतिक्रमणधारकांना या योजनेचा लाभ मिळावा यासाठी अशा शासकीय जमिनीवरील त्यांची अतिक्रमणे नियमानुकूल करण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने दिनांक १३ नोव्हेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेनुसार विहित अटी या अत्यंत जाचक असल्यामुळे अनेक व्यक्ती यात पात्र ठरत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेचा लाभ ज्यांच्याकडे स्वत:ची जागा नाही अशा व्यक्तींनासुध्दा स्वत:चे घर बांधावयाचे असल्यास त्यांना देण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, किती अतिक्रमणधारकांना या योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे,
(५) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१९-१२-२०२३) :** (१) सर्वांसाठी घरे - २०२२ या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात असलेल्या शासकीय जमिनींवरील अतिक्रमण नियमानुकूल करण्याबाबत या विषयाबाबत नगर विकास विभागाने दि. १७ नोव्हेंबर, २०१८ रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे, हे खरे आहे.
(२), (३),(४), (५) व (६) नगर विकास विभाग शासन निर्णय दि. १७ नोव्हेंबर, २०१८ व ग्राम विकास विभाग शासन निर्णय दि. १६ फेब्रुवारी, २०१८ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयातील बाबी व धोरणास अनुलक्षून कार्यवाही करण्यात येत आहे.

याबाबतचा तपशील नगर विकास विभाग, गृहनिर्माण विभाग तसेच ग्राम विकास विभागाकडून मागविण्यात येत आहे.

---

**मावळ (जि.पुणे) परिसरातील इंद्रायणी या लोकप्रिय भाताच्या बोगस बियाण्यांची विक्री होत असल्याबाबत**

**(५०) ७७७४० (११-१२-२०२३). श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील मावळ, मुळशी, भोर, वेल्हे इतर भागात इंद्रायणी तांदूळाची लागवड मोठ्या प्रमाणावर होत असून इंद्रायणी तांदूळाच्या बोगस बियाणामुळे शेतकऱ्यांच्या भात पिकाचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी कासारसाई (ता.मुळशी), कुसगाव (ता.मावळ) व नामा गावातील शेतकऱ्यांनी बियाणांच्या निकृष्ट दर्जाबाबत तालुका कृषी अधिकाऱ्यांकडे तक्रार केली असता या संदर्भात चौकशी करण्याकरिता कृषी संशोधक, भात संशोधक व कृषी अधिकारी यांची संयुक्त समितीद्वारे शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी करुन बियाणांचे नमुने घेऊन प्रयोगशाळेत पाठविण्यात निर्णय घेण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देणे, महाबीज तसेच इतर कंपन्यांमार्फत होणाऱ्या बोगस बियाण्यांची विक्री रोखणेसह संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१५-१२-२०२३) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
इंद्रायणी या वाणाच्या बियाण्याबाबत मावळ तालुक्यात ११ तक्रारी व मुळशी तालुक्यात ३ तक्रारी अशा एकुण १४ तक्रारी प्राप्त आहेत. तालुकास्तरीय बियाणे तक्रार निवारण समितीने तक्रारदार शेतक-यांच्या क्षेत्रावर जाऊन पाहणी करुन पंचनामे केले आहेत. समितीच्या पाहणीवेळी बियाणे नमुने उपलब्ध झाले नाहीत. शेतकऱ्यांच्या नुकसानीचे प्रमाण २५ ते ५० टक्के होते.
(३) तालुकास्तरीय तक्रार निवारण समितीने तक्रारदार शेतकऱ्यांच्या प्रक्षेत्रावर जाऊन पाहणी केली व तालुका स्तरीय तक्रार निवारण समितीचा अहवाल सर्व शेतक-यांना देण्यात आला आहे. सदर अहवालांनुसार बियाणे कंपन्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

महाबीज, अकोला यांनी भात इंद्रायणी वाणाचे ६६०४.८५ क्वि. प्रमाणित बियाणे मावळ, मुळशी, भोर, वेल्हे तालुक्यांसह पुणे जिल्ह्यात पुरवठा केले होते. सदर बियाणे बीज प्रमाणिकरण यंत्रणेच्या उगवण व भौतिक शुध्दता चाचणीमध्ये पात्र झालेले आहे. पुरवठा केलेल्या सदर बियाणांमधील एकूण १५ बिजोत्पादकांच्या ९.२५ क्विंटल मात्रेच्या भेसळीच्या तक्रारी प्राप्त झाल्या असून तक्रारींचे प्रमाण एकूण पुरवठा मात्रेच्या केवळ ०.०९% आहे. यामुळे महाबीजमार्फत पुरवठा केलेले भात इंद्रायणी वाणाचे बियाणे बोगस आहे हे म्हणणे संयुक्तिक नसल्याचे महाबीज, अकोला यांनी कळविलेले आहे. तथापि, शेतकऱ्यांना ग्राहक मंच न्यायालयाकडे दाद मागण्यासाठी मार्गदर्शन केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**

**मुंबई.** **सचिव-१ (कार्यभार),**

**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.